मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | शुक्रवार, ०१ नोव्हेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १३२ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## केंद्राच्या धोरणामुळे कांदा महाग



**बारामती :** केंद्र सरकारमुळे कांदा महाग झाला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. केंद्र सरकारने कांद्याबाबत उशीर केला, हा उशीर अक्षम्य आहे असेही सुळे म्हणाल्या. सुप्रिया सुळे यांनी एक्सवर ट्वीट करून म्हटले आहे की, अन्नधान्याची महागाई दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या महागाईवर अंकुश ठेवण्यात भाजपाप्रणीत एनडीए सरकारला सपशेल अपयश आले आहे. सप्टेंबर महिन्यात महागाईचा दर 9.42 टक्क्यांवर गेला आहे. कांदा 70 रुपये किलो झाला तरीही मोठ्या प्रमाणात कांदा पुरविण्यासाठी रेल्वे रॅक देण्यास केंद्र सरकारने उशीर केला. यामुळे कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. केंद्र सरकारने केलेला उशीर अक्षम्य आहे, असेही सुळे म्हणाल्या.



### मोदींनी अकराव्यांदा सैनिकांसह साजरी केली दिवाळी

पान ८

# काँग्रेस पुन्हा फुटणार?

## मुंबई, कोल्हापुरात काँग्रेसला धक्के ; विधानसभेनंतर राजकीय भूकंपाची शक्यता

**प्रतिनिधी**
**मुंबई/कोल्हापूर**

लोकसभा निवडणुकीत राज्यात सर्वाधिक जागा जिंकलेल्या काँग्रेसनं विधानसभेलाही सर्वाधिक जागा पदरात पाडून घेतल्या. मात्र हक्काच्या जागांवर काँग्रेसला पाणी सोडावं लागलं. यावरुन पक्षात नाराजी उफाळली. त्यातून पुन्हा पक्षांतर आणि बंडखोरीला ऊत आला, त्याला कारण ठरलंय ते रवी राजा यांचा भाजप प्रवेश.

मुंबई महानगरपालिकेतील काँग्रेसचा प्रमुख चेहरा आणि ज्येष्ठ नेते रवी राजांनी काँग्रेसला आज सोडचिठ्ठी दिली. तर दुसरीकडे कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून उमेदवारी कापल्यानं विद्यमान



आमदार जयश्री जाधवांनी काँग्रेसला रामराम ठोकत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे लोकसभेत दमदार कामगिरी करणाऱ्या काँग्रेसला ऐन विधानसभेच्या तोंडावर फुटीचं ग्रहण लागलं. याचबद्दल बोलताना रवी राजा म्हणाले, माझ्या अनुभवाचा उपयोग केला नाही. रवी राजा हे काँग्रेस पक्षातून पाच वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. तब्बल 25 वर्षांचा नगरसेवकपदाचा त्यांना अनुभव आहे. ते मुंबई महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेतेही राहिले आहेत. सायन-कोळीवाडा मतदारसंघात त्यांचा चांगला प्रभाव आहे. दुसरीकडे, कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून उमेदवारी कापल्याने विद्यमान आमदार जयश्री जाधव यांनी काँग्रेसला रामराम ठोकत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. यामुळे कोल्हापूरी काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्याही वर्चस्वाला हा धक्का मानला जात आहे.

**रवी राजांचा भाजप प्रवेश / पान 7**

# हिंदुस्थानात अस्थिरता निर्माण करण्याचा खलिस्तान्यांचा डाव

## • सुरक्षा यंत्रणा सतर्क

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

पंजाब आणि आसपासचा परिसर अस्थिर करण्याचे षड्यंत्र खलिस्तानी रचत असल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (NIA) तपासादरम्यान समोर आले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा अत्यंत सतर्क झाल्या आहेत. या खलिस्तानी दहशतवाद्यांचे कारस्थान उधळून लावण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी काऊंटर प्लॅन तयार केला आहे.

भारतात अस्थिरता निर्माण करण्यासाठी खलिस्तानी गट काश्मीरच्या धर्तीवर पंजाबमध्ये स्थानिक समर्थकांचे नेटवर्क तयार करण्यात गुंतले असल्याचे एनआयएच्या तपासात उघड झाले आहे. कॅनडा आणि पाकिस्तानमध्ये आश्रय घेतलेल्या खलिस्तानी दहशतवाद्यांच्या इशाऱ्यावरून स्थानिक मॉड्यूलमध्ये तरुणांची भरती केली जात असल्याचेही सांगण्यात येते. स्थानिक मॉड्युलच्या माध्यमातून व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर खंडणी उकळायची आणि त्या पैशांतून खलिस्तान चळवळीला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न परदेशात बसलेले दहशतवादी मास्टर माइंड करत आहेत, असेही समजते.

एनआयएने अनेक वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये बब्बर खालसा इंटरनॅशनल (BKI) आणि



त्यांच्या समर्थकांसाठी निधी उभा करण्याचा कट उघडकीस आणला आहे. पाकिस्तानच्या सीमेवरून ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांची तस्करी स्थानिक मदतनीसांच्या माध्यमातून पंजाबमध्ये करण्यात येत असून यासाठी खलिस्तानी दहशतवादी पाकिस्तानच्या सीमेवर ड्रोनचा वापर करत असल्याचेही सांगण्यात येते.

आयएसआय (ISI) ही पाकिस्तानची गुप्तचर संस्थेकडून पंजाबमध्ये कार्यरत असलेल्या खलिस्तान समर्थक आणि गुंडांना मदत घेतली जात आहे. पंजाबमध्ये सक्रिय गँगस्टर्सच्या माध्यमातून स्थानिक मॉड्यूल्स किंवा स्थानिक मदतनीसांना विदेशातून निधी पुरवठा कला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. पाकिस्तानात लपलेला दहशतवादी हरविंदर सिंग रिंडा आणि कॅनडातील गुरपतवंत सिंग पन्नू हे दहशतवादी पंजाबमध्ये आपले नेटवर्क वाढवण्याच्या प्रयत्नात असल्याचेही सांगितले जाते.

## म ह त्त्वा चे

### तिरुपती बालाजी मंदिरातील कर्मचारी हिंदू असावेत - नायडू



**तिरुपती :** आंध्र प्रदेशातील जगप्रसिद्ध बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळ आढळल्याची घटना काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. तेव्हापासून बालाजी मंदिर कुठल्या ना कुठल्या कारणामुळे चर्चेत आहे. आता पुन्हा एकदा बालाजी मंदिर चर्चेत आले आहे. याचे कारण, तिरुमला तिरुपती देवस्थानम (TTD) बोर्डाचे नवे अध्यक्ष बीआर नायडू आहेत. त्यांनी गुरुवारी एक मोठे विधान केले आहे.भगवान व्यंकटेश्वराचे निवासस्थान असलेल्या तिरुमला येथे काम करणारे सर्व कर्मचारी हिंदू समाजातील असावेत, असे टीटीडी बोर्डाचे अध्यक्ष बीआर नायडू यांनी म्हटले आहे. तिरुमला येथे काम करणाऱ्या इतर धर्माच्या कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय घ्यावा, याविषयी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील आंध्र प्रदेश सरकारशी बोलणार असल्याचेही नायडू यांनी सांगितले आहे.

### BPLचे फाऊंडर टी. पी. गोपालन नांबियार यांचं निधन



**बंगळुरु :** देशातल्या दिग्गज इलेक्ट्रॉनिक कंपन्यांपैकी एक असणाऱ्या बीपीएल ग्रुपचे फाऊंडर टी. पी. गोपालन नांबियार यांचं गुरूवारी निधन झालं आहे. टी. पी. गोपालन नांबियार यांच्या नातेवाईकांनी निधनाचं वृत्त सोशल मीडियावर शेअर केलं. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, 94 वर्षीय गोपालन नांबियार हे काही दिवसांपासून आजारी होते. गुरुवारी सकाळी 10.15 च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. टी. पी. गोपालन नांबियार यांचा केरळ आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांशी विशेष संबंध होता..टी. पी. गोपालन नांबियार यांच्या निधनाबद्दल कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं की, "बीपीएल ग्रुपचे संस्थापक टी.पी. गोपालन नांबियार यांच्या निधनाच्या बातमीने दुःख झाले. त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. ज्येष्ठ काँग्रेस नेते शशी थरूर यांनीही गोपालन नांबियार यांच्या निधनावर शोक व्यक्त केला.

### आंबेडकरांच्या हृदयात रक्ताची गुठळी, उपचार सुरु



**पुणे :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब – प्रकाश आंबेडकर यांना अचानक छातीत दुखू लागल्याने गुरुवारी पहाटे साडे चार वाजता त्यांना पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, त्याच्या अँजिओग्राफी करण्यात येणार आहे, अशी माहिती बाळासाहेब आंबेडकर यांचा मुलगा सुजात आंबेडकर यांनी दिली आहे. दरम्यान, डॉक्टरांची एक टीम सध्या त्यांच्यावर उपचार करत आहे. तर प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती सध्या स्थिर असून काळजी करण्याचं कारण नाही. वंचितच्या कार्यकर्त्यांनी रूग्णालय परिसरात येऊ नये, असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी आवाहन केले आहे. त्यांच्या हृदयात रक्ताची गुठळी झाल्याचे समजते.

## घराच्या वादातून भावाकडून भावाची आईसमोर हत्या

**विशेष प्रतिनिधी**
**पालघर**

आईला मंजूर झालेले घरकुल कोणी बांधावे, यावरून झालेल्या भांडणात सख्ख्या भावावर आईसमोरच कोयत्याने सपासप वार करून त्याची हत्या केल्याचा प्रकार माहीम गावातील साखरेपाडा येथे घडला आहे.

सतीश जेठू पाटील (वय 35) असे आरोपीचे नाव आहे. सतीशला सातपाटी सागरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. साखरेपाडा येथे आरोपी सतीश पाटील हा लहान भाऊ चंद्रकांत पाटील (वय 33) याच्यासह राहत होता. जुन्या घरात एक आडवी भिंत घालून हे दोन्ही भाऊ वेगवेगळे राहत होते. त्यांच्या आईचे मंजूर झालेले घरकुल कोणी बांधावे यावरून दोन्ही भावांमध्ये मोठा वाद होता. त्यातच भाऊ आपल्या मुलाला आरोपीच्या घरी जाऊ देत नसल्याचा रागही उफाळून यायचा. दुपारी घरकुलावरून या दोन भावांमध्ये पुन्हा मोठा वाद झाला. या वेळी सतीश घरातील कोयता उचलून लहान भावाला मारण्यास धावला. तेव्हा हा वाद सोडवण्यासाठी पुढे होत आईने मुलाच्या हातातील कोयता हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीने आईच्या अंगावरच कोयता उगारत 'तू बाजूला हो, नाहीतर तुलाही मारून टाकीन,' असे धमकावले. आई घाबरून बाजूला झाल्यानंतर सतीशने आपल्या लहान भावाच्या मानेवर, पाठीवर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात भाऊ चंद्रकांत याचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर पळून गेलेल्या आरोपीचा माग काढण्यास सातपाटी पोलिसांनी सुरुवात केली. शोधमोहिमेनंतर एका वाडीत लपलेल्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले.

## जगभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी

### न्यूयॉर्कमधील एम्पायर स्टेट बिल्डिंग दिव्यांनी उजळून निघाली

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

आजपासून देशभरात दिवाळीला सुरुवात झाली आहे. देशासह जगभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. देशातील प्रत्येक घर दिव्यांनी उजळून निघत आहे, तर दुसरीकडे परदेशातही दिवाळी साजरी होत आहे. एम्पायर स्टेट बिल्डिंग गुरुवारी दिवाळीनिमित्त दिव्यांनी उजळून निघाली.

न्यू यॉर्कमधील भारताचे वाणिज्य दूतावास म्हणाले की, चमकणारे दिवे अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहेत. दिवाळी साजरी करण्यासाठी प्रतिष्ठित एम्पायर स्टेट बिल्डिंग केशरी दिव्यांनी उजळून निघाली आहे. हे अंधारावर प्रकाशाच्या



विजयाचे प्रतीक आहे. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री इस्रायल कॅटझ यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, माझा मित्र एस जयशंकर, मी तुम्हाला आणि भारतातील लोकांना दिवाळी 2024 च्या शुभेच्छा देतो. इस्रायल आणि भारत लोकशाही, स्वातंत्र्य आणि उज्वल भविष्याची दृष्टी ही मूल्ये सामायिक करतात. दिव्यांचा हा सण आपल्या सर्वांना सुख, समृद्धी आणि शांती घेऊन येवो. दिवाळीच्या शुभेच्छा.

भारतातील यूएस राजदूत एरिक गार्सेटी यांनीही शुभेच्छा दिल्या.त्यांनी एक्सवर पोस्ट शेअर केली. ते म्हणाले की, या दिवाळीत, मिशन इंडियामध्ये, भारतीय आणि अमेरिकन सर्वांसाठी **पान 8 वर**

## आम्ही राहुल गांधी यांना भेटण्यासाठी उत्सुक!

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह दत्तात्रय होसबळेंच मोठं विधान

**प्रतिनिधी**
**गांधीनगर**

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने भाजपची धूळधाण उडवली. भाजपला बहुमताचा आकडाही गाठता आला नाही. त्यामुळे सत्तेत आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा बदलली असून एनडीए सरकार असे बोलत फिरत आहेत. आता भाजपची पितृ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आता मोठे विधान केले आहे.



लोकसभेत काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजप आणि संघावर जोरदार हल्लाबोल केला होता. संघ आणि भाजप संपूर्ण हिंदू समाज नाही असे राहुल गांधी म्हणाले होते. 'भारत जोडो' यात्रेतही राहुल गांधी म्हणाले होते की द्वेषाच्या या बाजारात आम्ही प्रेमाचं दुकान मांडतोय. आता राष्ट्रीय स्वयंकसेवक संघाकडून काँग्रेसबाबत मोठे विधान आले आहे. संघाचे वरिष्ठ नेते आणि संघात दुसऱ्या क्रमांकाचे नेते समजले जाणारे दत्तात्रय होसबळे म्हणाले की, आमचे आणि काँग्रेसचे कुठलेही वैर नाही. आम्ही संघाचे लोक समाजाच्या प्रत्येक व्यक्तींना भेटतो. आम्ही वर्षभर इतर पक्षाच्या नेत्यानांही भेटतो असेही होसबळे म्हणाले.

**पान 8 वर**

## 'ट्रम्पेट'चे तुतारी भाषांतर रद्द, राष्ट्रवादीला दिलासा

**मुंबई ।** विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने ट्रम्पेट या चिन्हाचे तुतारी हे भाषांतर रद्द केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला लोकसभा निवडणुकीसाठी तुतारी फुंकणारा व्यक्ती असे निवडणूक चिन्ह मिळाले होते. पण काही ठिकाणी ट्रम्पेट हे चिन्ही काही उमेदवारांनी देण्यात आले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मतदारांचा काही ठिकाणी गोंधळ झाला होता. त्यामुळे निवडणूक आयोगाने ट्रम्पेट या निवडणूक चिन्हाचे तुतारी हे मराठी भाषांतर रद्दे केले आहे. ज्या उमेवदावारेच चिन्ह ट्रम्पेट असेल तर तिथे देवनागरीत ट्रम्पेट असेच लिहिलेले असेल. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारापुढे तुतारी वाजवणारा माणूस असे लिहिलेले असेल. त्यामुळे मतदारांचा गोंधळ उडणार नाही. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादीला दिलासा मिळाला आहे.



## मनसेला महायुतीत सध्यातरी 'स्कोप' नाही

**नागपूर ।** राज ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत केलेल्या वक्तव्यानंतर ते महायुतीत सहभागी होणार की काय, या चर्चांना उधाण आले होते. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. मनसेने अनेक जागांवर त्यांचे उमेदवार उभे केले आहेत. ते उमेदवार मागे घेणार नसल्यामुळे त्यांच्याशी बऱ्याच ठिकाणी थेट लढत होणार आहे. त्यामुळे सध्या तरी मनसे महायुतीत येण्याचा सध्यातरी 'स्कोप' नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले.

नागपुरात ते गुरुवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. राज ठाकरे यांच्याशी माझे मित्रत्वाचे संबंध आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांनी बिनशर्त पाठिंबा दिला होता. परंतु या निवडणुकीमध्ये त्यांची भूमिका वेगळी आहे.

**पान 8 वर**

## 'एक देश एक निवडणूक' अशक्य

**गुलबर्गा ।** 'एक देश एक निवडणूक' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संकल्पना आहे. परंतु एक देश एक निवडणूक शक्यच नाही असे मत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी व्यक्त केले आहे.

माध्यमांशी बोलताना खर्गे म्हणाले की, एक देश एक निवडणुकीवरचा प्रस्ताव जेव्हा संसदेत सादर होईल तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींना सर्व पक्षाच्या नेत्यांना विश्वासात घ्यावे लागेल. त्यानंतरच ही बाब शक्य आहे. पण



एक देश एक निवडणूक शक्यच नाही असे खर्गे म्हणाले. मोदी-शहा मनाला वाटेल तशी सत्ता राबवत आहेत. त्यातूनच त्यांना ही कल्पना सुचली. पण हे अस्तित्वात येणं जवळपास अशक्य आहे, असं खर्गे म्हणाले.

## एक देश एक कायदा...

### मोदींनी पुन्हा दिले समान नागरी कायदा लागू करण्याचे संकेत

**प्रतिनिधी**
**गांधीनगर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने भारताच्या एकतेवर आणि अखंडतेवर जोर देत भारताच्या या गुणविशेषांचा गौरव केला. भारत देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीला वंदन पंतप्रधान मोदी यांनी वंदन केले. त्याच बरोबर, भारत देश 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेकडे वाटचाल करीत आहे जेणेकरून, लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका एकत्र घेता येतील.

यासोबत मोदी म्हणाले की, भारत आता एका समान नागरी कायद्याकडे वाटचाल करत आहे. उत्तराखंडमधील भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने या वर्षाच्या सुरुवातीला त्यांच्या राज्य



विधानसभेत एकसमान नागरी संहिता पास केली. ऐतिहासिकदृष्ट्या, काही विशिष्ट मतदारांच्या प्रतिक्रियेच्या भीतीने एकामागून एक आलेल्या सरकारांनी या धर्म-आधारित कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचे टाळले होते.

***अर्बन नक्षलींचा बिमोड करावाच लागेल!***

*"भारताच्या विकासामुळे आता काही जणांना अडचण निर्माण झाली आहे. केवळ राजकारणासाठी आणि स्व:ताचा स्वार्थ पूर्ण करण्यासाठी काही लोक देशाच्या एकतेवर घाला घालण्याचा प्रयत्न करत आहेत", असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. अर्बन नक्षलवाद्यांच्या विरोधात आपल्याला आता लढायचे आहे असा संदेश मोदींनी दिला. राष्ट्रीय एकतमता दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी गुजरातमधल्या केवाडीया येथे बोलत होते. सरदार पटेल यांच्या स्मृतीस्थळाला मानवंदना देत मोदी म्हणाले, आज जगभरातील देश भारताजवळ येत आहेत.*

मागच्या दशकभरातील वाटचालीवर भाष्य करताना मोदी म्हणाले की, स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या प्रमाणेच एकता दिवस सुद्धा दिमाखात साजरा केला गेला पाहिजे. आज सरदार पटेल यांच्या 150 व्या जयंतीची सुरूवात होत आहे.

**पान 8 वर**



*मुंबई : मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या मरीन खात्यातील फर्स्ट क्लास मास्टर व मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे उपाध्यक्ष अहमद के. काझी ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई पोर्ट मधील ३६ वर्षांच्या निष्कलंक व प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यानिमित्ताने त्यांचा मरीन खात्यातील शोअर व फ्लोटीला कामगारांच्या वतीने इंदिरा गोदीत मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड. जनरल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार नेते अ‍ॅड. एस. के. शेट्ये यांच्या हस्ते युनियनच्या वतीने शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ व समई भेटवस्तू देऊन युनियनच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अहमद काझी यांचा सत्कार करण्यात आला.*



## वनगा अखेर चार दिवसांनंतर घरी परतले

# राजकारणात प्रामाणिकपणा राहिला नाहीय, त्याची शिक्षा मी भोगतोय!

**प्रतिनिधी**
■ **पालघर**

पालघर विधानसभेचे तिकीट न मिळाल्याने नाराज झालेले शिंदे शिवसेनेचे नेते श्रीनिवास वनगा चौथ्या दिवशी घरी परतले. वनगा नैराश्यात गेले होते. ते घर सोडून निघून गेले होते. त्यांचे दोन्ही मोबाइल बंद होते. चार दिवसांनंतर ते घरी आपल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना आणि कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला. यावेळी श्रीनिवास वनगा यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी राजकारणामध्ये प्रामाणिकपणा राहिला नाही. त्याची शिक्षा मी भोगत आहे,असे परखड मत व्यक्त केले.

श्रीनिवास वनगा यांनी सांगितले की, 'मला सांगितले होते की एकाही आमदाराला आम्ही डावलणार नाही. तिकीट देणार आणि १०० टक्के निवडून आणणार. पण माझ्याविरोधात कुठेतरी जाणूनबुजून षडयंत्र रचले गेले आणि माझे तिकीट कापले गेले. माझ्या मतदारसंघात मी खूप प्रामाणिकपणे काम करत होतो. मी रागाच्या भरात गेलो होतो. पण खूप लांब गेलो नव्हतो, तर नातेवाईकांकडे गेलो होतो. माझी फॅमिली खूपच डिस्टर्ब आणि नाराज होती. मुलगा आजारी होता. शेवटी किती दिवस हे नाटक करणार. त्यामुळे सुखरूप घरी येण्याचे मी ठरवले.



> *'माझा पत्ता कट करण्याचे काम प्लॅनिंगने केले. कार्यकर्त्यांना भडकावले. जिल्हाप्रमुखांच्या जवळचा उमेदवार पाहिजे होता. त्यांच्या अंडर राहून काम करेन. मी प्रामाणिकपणे राहिन आणि निष्ठेने पक्षाचे काम करेन'.*
> ***- श्रीनिवास वनगा***

## सतत निष्ठावंतांवर अन्याय...

# संधीसाधू राजकारण्यांमुळे कार्यकर्त्यांत नाराजीचा उद्रेक

**प्रतिनिधी**
■ **वसई**

विधानसभा निवडणुका जवळ आल्याने पुन्हा एकदा संधीसाधू राजकारणाचा ऊत आला आहे. विविध पक्षांतून संधी शोधणारे नेते लाभाचे गणित साधत एकीकडून दुसरीकडे जात आहेत. पक्षासाठी कष्ट करणारे, जनसंपर्क राखणारे निष्ठावंत मात्र बाहेर फेकले जात आहेत. हे कार्यकर्ते पक्षाचे काटकसरीने पालन करत असूनही निवडणूक तोंडावर आल्यावर त्यांना संधी न मिळाल्याने त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे. "सतत निष्ठावंतांची अवहेलना होत असेल तर पक्षासाठी का काम करायचे?" असा प्रश्न कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

संपूर्ण राज्यात असेच राजकीय हालचाली सुरू आहेत. धनाढ्य, आर्थिक ताकद असलेल्या नेत्यांनी आपल्या सुविधांसाठी पक्षबदलाचा मार्ग धरला आहे. तळमळीने काम करणारे निष्ठावंत मात्र प्रत्येक वेळी दुर्लक्षितच राहतात. त्यामुळे पक्षासाठी रात्रंदिवस झटलेल्या कार्यकर्त्यांची आता वैफल्यग्रस्तता वाढत आहे. पालघर जिल्ह्यात अशा "आयाराम" नेत्यांनी पुन्हा कार्यकर्त्यांच्या संधीवर दरोडा टाकल्यामुळे अनेक निष्ठावंतांवर अन्याय झाला आहे. बोईसरमधील माजी आमदार विलास तरे आणि राजेंद्र गावित यांनी विक्रमगडमध्येही अशाच रीतीने निष्ठावंतांच्या संधीवर घाला घातल्याची चर्चा आहे.

वसई आणि नालासोपारा मतदारसंघांत शिवसेनेने वारंवार झुंज दिली असताना या मतदारसंघांत काँग्रेसला संधी दिल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजी पसरली आहे. काँग्रेसच्या उमेदवारांच्या अर्ज भरण्याच्या वेळी शिवसैनिकांनी पाठ फिरवली, हे या नाराजीतून स्पष्ट होते. महाविकास आघाडीतील अंतर्गत ताणतणाव भविष्यात बहुजन विकास आघाडीला फटका देऊ शकतो.सर्वसामान्य निष्ठावंत कार्यकर्त्यांना दुर्लक्षित करून संधीसाधू नेत्यांना गोंजारण्याच्या पद्धतीवर कार्यकर्त्यांचा रोष वाढत आहे. या अन्याय्य प्रवृत्तीविरोधात कार्यकर्त्यांमध्ये बंडखोरीचे मनसुबे फुलू लागले आहेत.

## थोडक्यात

### पालघर जिल्ह्यातील 13 उमेदवारी अर्ज बाद

**पालघर:** जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीसाठी ९० नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत. बुधवारी (ता. ३०) झालेल्या छाननीमध्ये १३ नामनिर्देशनपत्रे विविध कारणाने रद्द झाली असून ७७ अर्ज आता शिल्लक राहिले आहेत. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अखेरची मुदत ४ नोव्हेंबर आहे. हे अर्ज कोणी मागे घेतल्यानंतरच विधानसभेच्या सहा जागांसाठी किती उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत, हे समजणार आहे. विक्रमगड मतदारसंघामध्ये सर्वाधिक सहा अर्ज विविध कारणांनी बाद झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्याखालोखाल वसईचा क्रमांक लागतो. पालघर आणि नालासोपारा मतदारसंघात एकही अर्ज रद्द करण्यात आला नाही. विक्रमगडमध्ये सर्वाधिक अर्ज दाखल असून सर्वात कमी इच्छुक उमेदवार बोईसर आणि डहाणूमध्ये असल्याचे समोर आले. मतदारसंघ दाखल अर्ज बाद नामनिर्देशनपत्र शिल्लक अर्ज; विक्रमगड २१६१५, पालघर १५०१५, बोईसर ११११०, नालासोपारा १६०१६, वसई १६५११, डहाणू ११११०

### मुंबईत रेबीजमुळे कोल्ह्याचा मृत्यू

**मुंबई:** चेंबूरमध्ये नुकत्याच मृत्यू पावलेल्या कोल्ह्याला रेबीज झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मुंबईमध्ये रेबीजची लागण होऊन वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याची ही पहिलीच घटना आहे. दरम्यान, ही एक गंभीर समस्या असून याकडे कांदळवन कक्ष आणि ठाणे वन विभागाने आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्ला अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. व्ही. क्लेमेंट बेन यांनी दिला आहे.एक महिन्यापूर्वी वेगवेगळ्या दिवशी चेंबूर परिसरात पाच अशक्त जखमी कोल्हे आढळले होते. याबाबत तक्रार दाखल होताच वनविभागाने मदतकार्य हाती घेतले. यादरम्यान कोल्ह्यांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उद्यानातील वैद्याकीय विभाग आणि रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वेल्फेअर (रॉ) संयुक्तपणे जखमी कोल्ह्यांवर उपचार करीत होते.यापैकी चार कोल्ह्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर एका कोल्ह्याचा रूग्णालयात दाखल होण्यापूर्वीच मृत झाला होता.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# जीवन प्रबोधिनी संस्थेची कॅन्सर ग्रस्त लहान मुलांसमवेत दिवाळी



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

जीवन प्रबोधिनी ट्रस्ट च्या माध्यमातून दीपावलीच्या निमित्ताने कॅन्सर ग्रस्त लहान मुले आणि त्यांच्या पालकांसमवेत एक क्षण विरंगुळा या कल्पनेतून रविवारी सकाळी ९ ते दुपारी १२.३० या वेळेत दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी या मुलांसाठी जादूचे प्रयोग सादर करण्यात आले. मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या. त्याचप्रमाणे सामाजिक आणि क्रिडा क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देणाऱ्या वीस व्यक्तींचा सन्मान देखील करण्यात आला. तसेच दंत चिकित्सा शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हरीश पाठक - अधिष्ठाता केईएम रुग्णालय मेडिकल कॉलेज, उमेश पोवार - आकार कन्सल्टंट चे संचालक, महेश मुदलीयार - विश्वस्त , श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, रतिश पाटील - तलाठी पंथ फर्म, श्रीकृष्ण हरचांदे - ज्येष्ठ स्तंभलेखक , संजय कारेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी या संस्थेचे संस्थापक सत्यवान नर यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष अमित पवार, सरचिटणीस - हेमंत मकवाना, खजिनदार - गणेश क्षीरसागर आणि संयोजक - गणेश पार्टे यांच्यासह संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे उत्तम आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे कॅन्सर ग्रस्त लहान मुले आणि त्यांचे पालक यांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

# तुषार दिवाळी अंकाचे डॉ. रसनकुटे यांच्या हस्ते प्रकाशन

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर येथे वसईतील प्रख्यात तुषार प्रकाशन, दैनिक आपलं उपनगर आणि आभाळमाया जनकल्याण चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, तुषार दिवाळी अंक २०२४ चं प्रकाशन प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार डॉ. अ. ना. रसनकुटे यांच्या शुभहस्ते रविवारी , समाज उन्नती मंडळ हॉल, माणिकपूर, वसईरोड (प.) येथे पार पडला.

यावेळी प्रा. डॉ. महादेव इरकर प्रख्यात साहित्यिक व व्याख्याते, कु. दक्षता लोखंडे सुप्रसिद्ध गायिका, चरण घायवट संचालक, डॉ. अरूण घायवट संपादक, सौ. अनिता



घायवट संपादिका, संध्या गायकवाड उपसंपादिका आदि मान्यवर उपस्थित होते. पहिला दिवाळी अंक भारतात कधी प्रकाशित झाला ? त्याला आता किती वर्षे झाली ? मराठी साहित्यात दिवाळी अंकाचं महत्त्व काय अणि दिवाळी अंक का वाचले पाहिजेत याचं प्रतिपादन प्रमुख अतिथी डॉ. रसनकुटे यांनी केले.

या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात साहित्यिक उपस्थित होते. प्रकाशन समारंभानंतर मराठी आणि हिंदी गाण्यांचा संगितमय कार्यक्रम "स्वर संध्या" ( कराओके ) पार पडला. यात अनेक गायकानी सहभाग घेतला होता. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजनबध्द सुत्रसंचालन संध्या गायकवाड आणि चरण घायवट यांनी संयुक्तीकरित्या पार पाडले. उपस्थितांना दिवाळी अंक, सन्मानचिन्ह देऊन आयोजकांनी सर्वांचे आभार व्यक्त केले व त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# मध्य रेल्वेवर सणाची गर्दी टाळण्यासाठी प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरते निर्बंध

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मध्य रेल्वेने आगामी सणासुदीच्या काळात प्रचंड गर्दी लक्षात घेऊन, निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. प्लॅटफॉर्मवरील गर्दीचे व्यवस्थापन करणे आणि स्टेशन परिसरात प्रवाशांची हालचाल सुरळीतपणे व्हावी त्यायोगे गर्दी टाळावी हे उद्दिष्ट रेल्वेने ठेवले आहे. दिवाळी सण आणि छठ पूजेदरम्यान प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीचे निर्बंध ८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत.




***या स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्री प्रतिबंधित***
*छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर*
*लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण*
*पुणे नागपूर*

***सूट***
*ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्यांना प्रवास सुलभ व्हावा यासाठी या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे. सणासुदीच्या काळात सुरळीत आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे अशी विनंती करण्यात आली आहे.*

# कामण रेल्वे स्थानक 'जंगलात' विषारी प्राण्यांचा धोका; प्रशासन सुस्त

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई पूर्वेतील मध्य रेल्वे मार्गावर असलेल्या कामण रेल्वे स्थानकाला सध्या जंगली गवतांनी वेढले आहे. त्यामुळे विषारी साप आणि इतर सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका वाढला आहे. प्रवासी या ठिकाणाहून जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत, परंतु रेल्वे प्रशासन या धोक्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून येते.




कामण रेल्वे स्थानक गावापासून दूर असून त्या परिसरात जंगली गवत भरपूर वाढले आहे. या गवतात सापासारखे विषारी प्राणी आढळतात. पावसाळ्यानंतर येथे गवताचे वाढलेले तन नियमितपणे काढण्याचे काम केले जात नाही. परिणामी, स्थानकातील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कामण परिसरात औद्योगिकीकरणामुळे मोठ्या संख्येने प्रवासी मुंबई, ठाणे आणि आसपासच्या ठिकाणांहून येतात. मात्र रेल्वे स्थानकाच्या परिसरातील जंगली गवतामुळे व विषारी प्राण्यांच्या संचारामुळे प्रवाशांना ताणाचा सामना करावा लागतो. जर स्थानकातील गवताला आग लागली तर गंभीर अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.रेल्वे प्रशासनाने त्वरित स्थानकातील गवताची सफाई करून प्रवाशांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

# वसईतील शिवसैनिकांचा संताप

## जिल्हाप्रमुखांना हटवण्याची उध्दव ठाकरेंकडे मागणी

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई तालुक्यातील शिवसेनेच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाला तिकीट न मिळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हाप्रमुख पंकज देशमुखांच्या भूमिकेमुळे शिवसेनेच्या उमेदवारीची संधी गमावल्याचा आरोप करीत, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांची हकालपट्टी करण्याची मागणी उध्दव ठाकरे यांच्याकडे पत्राद्वारे केली .

तालुक्यातील शिवसैनिकांनी वर्षानुवर्षे सत्ता स्थापनेसाठी कठोर परिश्रम केले आहेत. काँग्रेस, जनता दल आणि नंतर हितेंद्र ठाकूर यांच्या वर्चस्वाखाली असतानाही शिवसेनेने दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवत विरोधक म्हणून मजबूत अस्तित्व राखले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही शिवसेनेने दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवली होती. मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत वसई आणि नालासोपारा मतदार संघातून शिवसेनेला संधी न



मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे.महाविकास आघाडीचा घटक पक्ष असूनही शिवसेनेऐवजी काँग्रेसला उमेदवारी देण्यात आल्यामुळे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर माजी तालुका प्रमुख विनायक निकम यांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. 'शिवसेना कायम झेंडे मिरवते, पण इतर पक्षांना तिकीट दिले जाते,' असा रोष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

वसईतील या संतप्त बैठकीत विनायक निकम, शिरीष चव्हाण, किरण चेंदवणकर, विवेक पाटील, मिलिंद खानोलकर, मिलिंद चव्हाण, राजाराम बाबर, संजय गुरव, प्रथमेश राऊत, सुनील मुळ्ये, एड. भरत पाटील, एड. अनिल चव्हाण यांसारख्या शिवसेनेच्या बड्या नेत्यांनी सहभाग घेतला. या नेत्यांनी उध्दव ठाकरे यांना पत्र पाठवून जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांची तात्काळ हकालपट्टी करून वसईतील शिवसैनिकांना न्याय देण्याची मागणी केली आहे.पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मते, जिल्हाप्रमुख देशमुख यांनी वरिष्ठ नेत्यांशी संवाद साधला नाही, तसेच तालुक्यातील कार्यकर्त्यांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न केला नाही. परिणामी, वसई आणि नालासोपारा मतदारसंघात काँग्रेसला उमेदवारी देण्यात आली. या निर्णयाने शिवसैनिकांना मोठा धक्का बसला असून, 'जिल्हाप्रमुख हटाव, शिवसेना बचाव' अशी मागणी त्यांनी ठामपणे मांडली आहे.

शिवसेनेच्या इतिहासात पराभव आले असले तरी उमेदवारी न मिळण्याची नामुष्की शिवसेनेवर कधी ओढावली नव्हती. यावेळी मात्र जिल्हाप्रमुख देशमुख यांच्या कार्यकाळात ही स्थिती निर्माण झाली आहे. जबपर्यंत त्यांची हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत आम्ही पक्षासाठी काम करणार नाही, असे स्पष्ट मत पदाधिकाऱ्यांनी मांडले. "आम्हाला शिवसेनेच्या झेंड्याखाली लढायचे आहे, पण त्यासाठी जिल्हाप्रमुखाची हकालपट्टी झाली पाहिजे," असे मत कार्यकर्त्यांनी ठणकावून सांगितले.

# 'त्या' आदेशानुसार 20 हजार रुपये तरी बेस्ट कामगारांना सानुग्रह अनुदान द्या - सामंत

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्याच्या मुख्यमंत्री पदी उध्दव ठाकरे हे असताना त्यांनी सन २०२४ पर्यन्त बेस्टच्या सर्व कर्मचारी वर्गास कोरोना काळात केलेल्या उकृष्ट कामगिरी बद्दल रू.२००००/- इतका दिवाळी बोनस तीन वर्षांपर्यंत देऊन बेस्टच्या कर्मचारी वर्गाचा मान राखला होता. तो बोनस तरी बेस्ट कर्माऱ्यांना लागलीच देऊन टाका अशी मागणी बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी केली आहे.

माजी मुख्यमंत्री उद्व्धअव ठाकरे यांच्या आदेशानंतर वेळोवेळी महापालिका प्रमाणे बेस्ट कर्मचारी वर्गास दिवाळी बोनस वाढवून देण्यात येत होता.

यावर्षी देखील आम्ही आचारसंहिता लागण्याच्या अगोदरच मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी व बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांना दिवाळी बोनस दिवाळी पूर्वी देऊन बेस्टच्या कर्मचारी वर्गाची दिवाळी गोड करावी अशी लेखी मागणी पत्राद्वारे, महाव्यवस्थापक यांना आम्ही भेटुन केली होती, आणि महापालिका कर्मचारी वर्गांनुसार बेस्टच्या कर्मचारी वर्गास दिवाळी बोनस देण्याचे मान्यही केले असताना, सर्वांना दिवाळी बोनस मिळाला मग बेस्ट कर्मचारी वर्गाचा दिवाळी बोनस का अडवून ठेवला आहे. का यात कोणी राजकारण करीत आहे, किंवा महापालिका आयुक्त कोणाच्या आदेशाची वाट पाहत आहेत हे बघावे लागेल. असेही बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी म्हटले आहे.

# सांताक्रूझ, वांद्रे मधील पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी 7 कोटींची कामे करणार

## पालिकेकडून कंत्राट मंजूर

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सांताक्रूझ पूर्वमध्ये ग्रँड हयात मार्ग तसेच वांद्रे पूर्वेला शिवाजीनगर आणि जेपी रोड जंक्शनपासून नाला क्रमांक २४ पर्यंत पावसाळ्यात पाणी तुंबत असल्याच्या तक्रारींची दखल घेत या तीनही ठिकाणी सुमारे सात कोटी रुपये खर्च करून नाल्यांचे रुंदीकरण तसेच बांधणी केली जाणार आहे.

एच पूर्व विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयाने या कामांसंबंधीचा प्रस्ताव दिला होता. ग्रँड हयात रोड तसेच वांद्र पूर्व येथील शिवाजी नगर आणि जे. पी. रोड जंक्शनपासून नाला क्रमांक २४ पर्यंत पावसाळयात वारंवार पाणी साचत असल्याच्या तक्रारी पालिकेकडे केल्या जातात. स्थानिक आमदार, माजी नगरसेवक आदी लोकप्रतिनिधी याबाबत पालिकेकडे पाठपुरावा करीत आहेत. पालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी खात्याच्या अधिकार्यांनी विभाग कार्यालयातील अधिकार्यांसह या तीनही ठिकाणी पाहणी केली. तेथील पावसाळी पाणी वाहून नेणारे नाले मोडकळीस आलेले आहेत. काही ठिकाणी हे नाले बुजले गेले आहेत. त्यामुळे तेथून पाण्याचा योग्यरित्या निचरा होत नाही. परिणामी पाऊस झाल्यास पाणी साचून राहते. त्याचप्रमाणे ग्रँड हयात रस्त्यावर तर पर्जन्य जलवाहिन्याच नाहीत. त्यामुळे तेथे पावसाळी पाण्याच्या निचर्यासाठी नाले बांधण्याची गरज आहे. या परिसरातील पावसाळी पाणी वाहून नेण्याची व्यवस्था सध्या अपुरी पडत आहे. परिसरातील नाल्याची रुंदी वाढविण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यामुळे पाण्याचा जलद गतीने निचरा होण्यास मदत होईल.

या सर्व कामांसाठी पालिकेच्या सामाईक रास्त बाजारभाव २०२३ च्या दरसूचीनुसार कार्यालयीन अंदाज तयार करण्यात आला. त्यात खर्चाचा अंदाज पाच कोटी ८२ लाख १९ हजार रुपये खर्च येईल असे म्हटले होते. या कामासाठी निविदा मागविल्या असता तीन देकार प्राप्त झाले. यात डी. आर. शाह कन्स्ट्रक्शन कंपनीची उणे २२.९२ टक्के दराची निविदा ही निम्नतम देकाराची ठरली. ही निविदा मंजूर करण्याची शिफारस पालिकेकडे करण्यात आली होती. त्यानुसार या कामाचा तपशीलवार अंदाजित खर्च सहा कोटी ८१ लाख ८७ हजार इतका होणार आहे. पालिकेने यासंबंधीच्या प्रस्तावाला आचारसंहिता लागू होण्याच्या आधी मंजुरी दिली आहे. पालिकेच्या २०२४-२५ च्या भांडवली अर्थसंकल्पामध्ये अशा कामासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कंत्राटाच्या कालावधीत कंत्राटदाराने त्याच्या खर्चाने प्रवाहातील अडथळे दूर करणे, नाल्यातील गाळ काढणे अशी कामे करून नाल्याचा प्रवाह सुरळीत ठेवणे आवश्यक आहे.

**अपिल क्र. १९९३/२०२४**

**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलीय प्राधिकारी, पश्चिम उपनगरे यांचे न्यायालयात**

प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
Email ID- controllergreatormumbai@gmail.com

**सुनावणी नोटीस** **क्र. अजि/अनि/पउ/कार्या-४/अपिल क्र.१९९३/२०२४**
**दिनांक-२८/१०/२०२४**

विकासक,
शिवशक्ती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स ५ चेतना, १२४, **...-वादी/अपिलार्थी**
वल्लभभाई रोड, विलेपार्ले (प), मुंबई- ४०००५६ (APPELLANT/PETITIONER)
**विरुद्ध**
**१. सक्षम प्राधिकारी-६,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
**२. सलमा युसुफ शेख,** नवजीवन एसआरए सह. गृह. संस्था धोबीघाट, हाजी बापु रोड, मालाड (पू), मुंबई ९७
**३. सचिव/अध्यक्ष,** नवजीवन एसआरए सह. गृह. संस्था धोबीघाट, हाजी बापु रोड, मालाड (पू), मुंबई ९७. **...-प्रतिवादी/सामनेवाले (Respondent)**

**(Appeal under section 35 of Slum Act-1971)**

**विषयः- महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास अधिनियम- १९७१ चे कलम ३५ अन्वये अपिल**

अपिलार्थी / वादी व सामनेवाले / प्रतिवादी यांस कळविण्यात येते की, वादी यांनी या न्यायालयात अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगर यांचे न्यायालयात प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ येथे दिनांक. **०६/११/२०२४ रोजी दुपारी १२.००** वाजता सुनावणी ठेवण्यात आली आहे.

सदर सुनावणी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधीव्दारे आपलेकडील मुळ कागदपत्रांसह हजर राहून आपले लेखी म्हणणे व तोंडी युक्तीवाद मांडावे. वरील तारेखस आपण हजर न राहिल्यास प्रकरणी आपणास काहीही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन गुणवत्तेवर अर्धन्यायिक आदेश अथवा निर्देश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**स्थळप्रतीवर**
**मा. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे यांची सही असे**

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का) तथा अपिलीय प्राधिकारी पश्चिम उपनगरे करिता**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 132**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १३२**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**



*मुंबई : १८० वडाळा विधानसभेच्या शिवसेना-महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेद्वार सौ.श्रद्धा श्रीधर जाधव यांच्या निवडणुक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख, आमदार, .आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना नेते,सचिव, खासदार अनिलभाऊ देसाई, वडाळा विधानसभेतील शिवसेना, युवासेना,अंगिकृत संघटनांचे पदधिकारी, महिला-पुरुष शिवसैनिक, महाविकास आघाडीचे पदधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.*

# राज्यात सरकार भाजपचे नव्हे तर महायुतीचे येणार!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे राज ठाकरेंच्या वक्तव्यावर स्पष्टीकरण



प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीत स्वबळाचा नारा देणारे राज ठाकरे यांनी राज्यात भाजपचाच मुख्यमंत्री होईल आणि ते देवेंद्र फडणवीस असतील, असे म्हटल्याने राजकीय वर्तुळात तो चर्चेचा विषय ठरलाय. राज ठाकरे यांनी त्यांचा मुलगा अमित ठाकरे यांना माहीम विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलंय. तर अमित ठाकरे यांच्या विजयासाठी भाजपने कंबर कसली आहे. यावरून मनसे आणि भाजपची जवळीक मोठ्या प्रमाणात वाढली असून," मिले सुर मेरा तुम्हारा, तो स्वर बने हमारा" या पद्धतीने सध्या यांच्या छुप्या युतीकडे बघितले जातेय. त्यातच मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर लढणाऱ्या मनसेला उत्तर भारतीयांची मतं भेटणार का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारला असता, राज ठाकरे यांची भूमिका बदलली असून, त्यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका घेतली असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी सांगत राज ठाकरेंची पाठराखण केलीय.मात्र राज्यात सरकार भाजपचे नव्हे तर महायुतीचे येणार असा दावा फडणवीस यांनी केला. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात ते बोलत होते.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी, राज्यात भाजपचाच मुख्यमंत्री होईल व ते देवेंद्र फडणवीस असतील असे म्हटले आहे. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी त्यांचे आभार मानले आहेत. राज ठाकरे यांच्या शुभेच्छा त्यांनी आभाराने स्वीकारल्या आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात भाजपचे नाही तर महायुतीचे सरकार येणार असून मुख्यमंत्री सुद्धा महायुतीचाच होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. राज ठाकरे यांच्या भूमिकेत आता बदल झाला आहे. राज ठाकरे यांनी आता व्यापक हिंदुत्वाची भूमिका हाती घेतली आहे. क्षेत्रीय अस्मितेला सुद्धा भाजपचं नेहमीच समर्थन राहिलं आहे.

# मनसेचा दीपोत्सव म्हणजे आचारसंहितेचा भंग

## कार्यक्रम खर्च निवडणूक खर्चात टाकण्याची मागणी

## ठाकरे शिवसेनेची निवडणूक आयोगाकडे तक्रार

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दीपोत्सवाला नियमबाह्य परवानगी देत आचारसंहिता भंग करण्यात आल्याची तक्रार ठाकरे शिवसेनेचे सचिव,खासदार अनिल देसाई यांनी केली आहे. तसेच या कार्यक्रमाला माहीम विधानसभा मतदारसंघातील मनसेचे उमेदवार अमित ठाकरे उपस्थित असल्याने या कार्यक्रमाचा खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात ग्राह्य धरण्यात यावा, अशी देखील मागणी अनिल देसाई यांनी केली आहे.

मनसेच्या या दीपोत्सवाची तक्रार अनिल देसाई यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांच्याकडे केली आहे. दादर येथील छत्रपती शिवाजी पार्क येथे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षाच्या बॅनरखाली दीपोत्सव साजरा केला. याला बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेल्या नियमबाह्य परवानगीच्या विरोधात



देखील खासदार देसाई यांनी तक्रार दाखल केली आहे.

खासदार अनिल देसाई यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांची भेट घेत मनसेच्या या दीपोत्सवाप्रकरणी निवेदन देत तक्रार दाखल केली आहे. तसेच छत्रपती शिवाजी पार्क येथील कार्यक्रमात माहीम विधानसभेचे मनसे पक्षाचे अधिकृत उमेदवार अमित राज ठाकरे हे उपस्थित होते, त्यामुळे सदर कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी देसाई यांनी केली आहे.

याचसोबत आदर्श आचारसंहिता काळात सार्वजनिक जागांवर पक्षाच्या प्रचारात बेकायदेशीर परवानगी देण्याचा महापालिका अधिकारी आणि इतर संबंधित प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांवर भारत निवडणूक आयोगाने कडक कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी देखील मागणी या तक्रारीत ठाकरे सेनेचे खासदार अनिल देसाई यांनी केली आहे.

**हे तर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन - खासदार देसाई**

महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०२४ ची घोषणा झाली आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला छत्रपती शिवाजी महाराज पार्क या महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सार्वजनिक स्थळावर निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करून 'दीपोत्सव' साजरा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच या कार्यक्रमाकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षातर्फे सर्वत्र बॅनर, गेट व कंदिल लावण्यात आले आहेत, असा आरोप खा. देसाई यांनी केला.

# कोवीड मध्ये काम केलेल्या कंत्राटी तंत्रज्ञांची दिवाळी अंधारात

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेच्या केईएम रूग्णालय , नायर रूग्णालय ,शीव रूग्णालय ,कुपर रूग्णालय तसेच उपनगरीय रूग्णालयांत सुमारे ५-६ वर्षांपासुन कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

कोविड काळात जोखिम पत्करुन, रूग्णालयीन सेवा पुरविणाऱ्या सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा ऐन दिवाळीतच खंडीत केल्याने त्यांची दिवाळी अंधारात जाणार असल्याचे, 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने' चे उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे- बापेरकर यांनी म्हटले आहे. पालिकेच्या सर्वच रूग्णालयांमध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ,प्रयोगशाळा सहाय्यक,क्ष किरण तंत्रज्ञ, क्ष किरण सहाय्यक ,डायलिसिस तंत्रज्ञ, डायलिसिस सहाय्यक यांची अनेक पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांच्या सापेक्ष पालिकेने कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करुन घेतले होते. सदर कंत्राटी नियुक्तींचे वेळोवेळी नुतनीकरण करण्यात येत होते.

तथापि, जानेवारी २०२५ पर्यंत नुतनीकरण मिळालेल्या वरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबर नंतर ड्युटीवर येऊ नका असे संबंधित रूग्णालय प्रशासनाने सांगितले आहे. असे झाले तर कार्यरत कर्मचांर्यांवर कामाचा ताण पडणार असुन, अपुर्या कर्मचारी वर्गामुळे रुग्णालयीन सेवा कोलमडू शकते. त्यामुळे रिक्त पदभरती होईपर्यंत वरील पदांवर कंत्राटी पद्धत चालू रहावी यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांचे नुतनीकरण करावे अशी मागणी 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने' चे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे- बापेरकर यांनी आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

# सपा कार्यालय बनले गर्दूल्यांचा अड्डा

■ मुंबई

शिवाजीनगर मानखुर्द विधानसभा क्षेत्रामध्ये समाजवादी पक्षाचे आबु असीम आझमी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार नवाब मलिक यांच्यात सरळ लढत होत आहे. नुकतेच नवाब मलिक यांनी निवडणूक अर्ज भरताना मतदारसंघाबाबत प्रतिक्रिया दिली होती. गेल्या पंधरा वर्षांपासून ह्या मतदार संघात कोणत्याही प्रकारच्या नागरी सेवा सुविधा नाहीत.सर्वत्र अनारोग्याचे साम्राज्य पसरले आसुन नागरिकांचे हाल होत आहेत. तसेच अनेक मूलभूत सुविधांपासून हा परिसर वंचित असून गर्द ड्रग्स आणि अन्य नशिल्या पदार्थांच्या विळख्यात इथला तरुण वर्ग सापडला आहे. गुंड आणि नशेबाज लोकांच्या दहशतीमुळे शिवाजी नगर गोवंडी मानखुर्द परिसरात राहणाऱ्या सर्वमान्य नागरिक जीव मुठीत धरून जीवन जगत आहेत. खून



## मालिकांनी केला इंस्टावर व्हिडिओ वायरल

आणि चोरी, धाक दाखवून लुटणे हा गुंडाचा रोजचा प्रकार आहे. त्यामुळे नागरिकांच्या संरक्षणासाठी ना पोलिस यंत्रणा आहे ना स्थानिक लोक प्रतिनिधी. आता लोकांच्या हितासाठी जिवाच्या रक्षणासाठी मी स्वतः या मतदार संघात उभा आहे. माझं कुणाशी वैर नाही. पण या विभागातील लोकप्रश्नाना घेऊन विधान सभेत जायचे आहे. गुरुवारी यातील गर्दूल्यांच्या मुद्द्याला नवाब मलिक यांनी हात घातला असून सावधान... सपा कार्यालय बनले गर्दूल्यांचा अड्डा असा मजकूर टाकत नवाब मालिक यांनी इंस्टावर एक व्हिडिओ वायरल करून समाजवादी पार्टी कार्यालयातील प्रकार उजेडात आणला आहे.



***मुंबई : अंधेरी पश्चिम येथील सागर सिटी बिल्डिंग क्र. 7 ही 14 मजली इमारत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पाणी व लिफ्टची सुविधा नसल्याने येथील रहिवाशांनी काल रस्त्यावर उतरून आंदोलन केले. यामध्ये माजी नगरसेवक मोहसीन हैदर आपल्या कार्यकर्त्यांसह सहभागी झाले होते. हे प्रकरण डीएन पोलिसांसमोर गेले. पोलिस आणि महापालिका प्रशासनाने हा प्रश्न तातडीने सोडविण्याचे आदेश बिल्डरला दिले. यावेळी येथील रहिवाशांनी मोहसीन हैदर यांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली.***

# जरांगेंमध्ये राजकारणाचे वारं भिनलेय...

प्रतिनिधी
■ मुंबई

जरांगे केवळ आता मराठा समाजाचा चेहरा होऊ पाहत नाही. मराठा समाजाने त्यांना नाव, लौकिक, चेहरा दिला. परंतु त्यांच्यात राजकारणाचे वारं भिनलेय, असे टिकास्त्र भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी सोडले आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या भूमिका मराठा समाजासाठी ज्या पहिल्या होत्या त्या आता राहिलेल्या नाहीत. मराठा समाज ताकदीने महायुतीच्या मागे उभा राहील. निकालातून ते दिसून येईल, असा ठाम विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

आज दिवाळीच्या पहिल्या दिवशी भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडिंवर भाष्य केले. काँग्रेसचे रवी राजा यांच्या भाजपा प्रवेशावर दरेकर म्हणाले की, रवी राजा हे केवळ काँग्रेसचे कार्यकर्ते किंवा नेते नाहीत. तर एक अभ्यासू अशा प्रकारचे





विरोधी पक्षनेता म्हणून मुंबईकरांच्या प्रश्नावर मुंबई महापालिकेत त्यांची कारकीर्द गाजली आहे. लोकाभिमुख अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आहे. कोणीतरी आले एवढ्या पुरता हा विषय सिमीत नसून एक विरोधी पक्षनेता आज काँग्रेसमधून भाजपात येतो हे प्रतिबिंब कशाचे आहे हे काँग्रेसने समजून घेण्याची गरज आहे. विरोध पक्षनेत्यालाच आपल्या पक्षावर विश्वास नाही, भाजपावर विश्वास निर्माण होतो यावरून काँग्रेसमध्ये अनेक अशी लोकं आहेत जी भाजपाचे, महायुतीचे काम करणार आहेत आणि सरकार आणणार आहेत. आता विजय वडेट्टीवार येऊ नये. त्यांचीही काँग्रेसमध्ये घुसमट होतेय.

काल मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते यांची बैठक झाली. दोन तीन अपवाद वगळले तर सर्व ठिकाणची बंडखोरी क्षमतेय. ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा आहे. आम्ही तिन्ही पक्ष लढू, जिंकू आणि महाराष्ट्रावर महायुतीचा झेंडा फडकवू, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

मनोज जरांगे पाटील यांच्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, जरांगेंनी सगळयाच जागा लढवल्या पाहिजेत. त्यांचा हेतू पाडापाडीचा असेल तर त्याला मराठा समाज, मतदार दाद देणार नाही. लोकांना सकारात्मक राजकारण पाहिजेय. मराठा समाजाचे उमेदवार पाडायचे दुसऱ्या बाजूने ओबीसीतून आरक्षण द्या बोलायचे, इम्तियाज जलील यांना मिठ्या मारायच्या, हे मराठा समाजाला आवडत नाही. त्यांनी लढावे, जिंकावे यासाठी आमच्या शुभेच्छा असल्याचेही दरेकर म्हणाले. तसेच सर्व पक्षांना, सर्व जातीधर्मांना बरोबर घेऊन एक निधर्मवादी असा नेता म्हणून त्यांची छबी पुढे आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. जरांगेंनी आता समाजाच्या गोष्टी करू नयेत, राजकारण करावे आणि राजकीय पक्ष असतात तसे काम करावे, असा टोलाही लगावला.

# चेंबूर विधानसभा मतदारसंघात गीत गायन, वृक्षारोपण आदी उपक्रमातून मतदान जनजागृती

## केंद्रीय निवडणूक निरीक्षक डॉ. हिरा लाल, अधिकारी, नागरिकांची उपस्थिती

■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात (मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा) नागरिकांमध्ये मतदानासंदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत चेंबूर विधानसभा मतदारसंघात गीत गायन, वृक्षारोपण आदी कार्यक्रमांचे आज (दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४) आयोजन करण्यात आले. केंद्रीय निवडणूक निरीक्षक डॉ. हिरा लाल यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. परिसरातील नागरिक, संबंधित अधिकारी, कर्मचारी आदींनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी अधिक वाढवण्याच्या उद्देशाने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (परिमंडळ-३) विश्वास मोटे, उप आयुक्त (परिमंडळ-५) देविदास क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात पूर्व उपनगरातील विविध मतदारसंघांमध्ये 'स्वीप' उपक्रम अंतर्गत व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.

याच पार्श्वभूमीवर, चेंबूर विधानसभा मतदारसंघातील नारायण आचार्य उद्यान (डायमंड गार्डन) येथे गीत गायन, वृक्षारोपण आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय निवडणूक निरीक्षक डॉ. हिरा लाल यांनी यावेळी उद्यानात आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येकांनी मतदानाचा हक्क बजावावा. 'ग्रीन स्वीप' उपक्रम अंतर्गत प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी चेंबूर मतदारसंघातील ६१ मतदान केंद्रांच्या ठिकाणी प्रातिनिधिक स्वरुपात रोपटे वितरित करुन मतदानासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येईल, असेही डॉ. हिरा लाल यावेळी म्हणाले.

**पश्चिम रेल्वे**

**शुद्धीपत्रक**

निविदा सूचना क्र: ईएल-टीआरडीडब्ल्यू- ११८-२४-२५-११ दिनांकीत ३०.१०.२०२४. उघडण्याचा दिनांक ३०.१०.२०२४ (१५:३० वाजता) ऐवजी ११.११.२०२४ (१५:३० वाजता) बदलण्यात आली आहे. निविदेच्या सर्व अन्य अटी पूर्विप्रमाणेच राहतील. 0702

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**

**ओएचई फेरफार कामे**

**खुली ई-निविदा सूचना क्र.: केव्हायएन-एलडी-५८५-डब्ल्यू-७४४-कॉन्ट, दिनांक: २६.१०.२०२४. कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागामधील ईगतपुरी स्थानक येथील **पीएफ क्र. २/३ ते** पूर्व बाजूकडील ३.६ मी. रुंद एफओबीच्या विस्तारा संदर्भात सध्याच्या ओएचईचा फेरफार. **अंदाजे मूल्य:** रु५८३०५९७.२१. **ईरठे:** रु. ११६६००/- **निविदा अर्जाचे शुल्क:** ०/-. **पूर्तता कालावधी:** १२ महिने. **पूर्तता कालावधी:** निविदा सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ २६.११.२०२४ रोजी ११:०० वा. पर्यंत आहे. ई-निविदेचा पूर्ण तपशील मध्य रेल्वे अधिकृत **संकेतस्थळ http://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. पूर्ण कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल. निविदेचा पूर्ण तपशील वरी. डीईई (टीडी) केव्हायएन कार्यालय, कल्याण यांच्या "सूचना फलकावर" उपलब्ध आहे. **AK-520**

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे दंडनीय गुन्हा आहे

**मध्य रेल्वे**

**स्पेशल ब्युरीड रेल सिस्टीमची तरतूद**

खुली ई-निविदा सूचना क्र.- बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८४३.कॉन्टआर६ दि. २५.१०.२०२४. कामाचे नाव: निविदा क्र. बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८४३. कुर्ला, पनवेल आणि जुईनगर जिल्ह्यामधील सुरक्षितता आणि विश्वासार्हता वाढविण्यासाठी अर्थिंग आणि बॉंडिंगच्या तरतूदीसह एसपी, एसएसपी येथे स्पेशल ब्युरीड रेल अर्थिंग सिस्टीमच्या तरतूदीसाठी कॉन्टआर६. **अंदाजे मूल्य:** रु. १,४७,१७,३३२/-. **बोली सुरक्षा:** रु. २,२३,६००/-. **निविदा अर्जाचे शुल्क:** ०/- **पूर्तता कालावधी:** १२ महीने. **प्रस्तावांची वैधता :** ६० दिवस. **(I) वरील निविदेच्या निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ: २८-११-२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत** आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. (II) प्रस्तावित निविदाकारांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकच्या अधिका तपशिलासाठी www.ireps.gov.in ला भेट द्यावी. (III) उपरोक्त ई-निविदेमध्ये निविदाकार केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाच्या द्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेसाठी प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते उघडण्यात किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. (IV) बोली सुरक्षेचा भरणा निविदा कागदपत्रांमध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार करावा. (V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई विभाग, मध्य रेल्वे, अनेक्स बिल्डींग, २ रा मजला, सीएसएमटी, मुंबई-४००००१ दूर-०२२ २२६१२३५५ वर संपर्क करा. निविदेची पूर्ण माहिती www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. निविदेचा पूर्ण तपशिल वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई सीएसएमटी ४००००१ ह्यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहे. **AK-519**

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे दंडनीय गुन्हा आहे

**Format C-7**

**(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party) Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates criminal cases.**

**(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition (C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 211)**

Name of Political Party : **All India Majlis-E-Ittehadul Muslimeen (A.I.M.I.M.)**
*Name of Election : **General Election to Legislative Assembly, Maharashtra, 2024**
Name of the State/UT : **Maharashtra**

(1) Name of theConstituency : **184-Byculla Constituency**
Name of the Candidate : **Faiyaz Ahmed Rafique Ahmed Khan**

| S. No. | Criminal Antecedents | | |
|---|---|---|---|
| 1. | a. | Nature of the offence | **1) u/sec. 153, 505 (1) (B) of IPC 2) u/sec. 354, 509, 352, 504, 142, 147, 149 of IPC** |
| | b. | Case No. | **1) F.I.R. No. 65/2020 at Nagpada Police Station 2) F.I.R. No. 77/2020 at Nagpada Police Station** |
| | c. | Name of the Court | **1) Charge Sheet not filed 2) Charge Sheet not filed** |
| | d. | Whether charges have been framed or not (yes/No) | **1) No 2) No** |
| | e. | Date of conviction, if any | **1) Not Applicable 2) Not Applicable** |
| | f. | Details of punishment undergone, if any | **1) Not Applicable 2) Not Applicable** |
| | g. | Any other required to be give information | **1) NIL 2) NIL** |
| 2. | The reason for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | **The selected candidate is very sincere & is very dedicated towards the party, the candidate has a very good reputation in the society as he is doing social work at large scale in his area.** |
| 3. | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | **The cases registered against above named candidate, are relating to the political enmity as he has a long political history in his area so he is more suitable candidate to be selected as a MLA.** |

sd/-
Signature of the office bearer of the Political Party
Name and designation : **Ajaz Ahmed Khan**
**South Mumbai District President**

श्रद्धेची कमतरता हीच साऱ्या कष्टांचं आणि दु:खांचं मूळ असते.



- नेताजी सुभाषचंद्र बोस

वृत्तमानस

मुंबई, शुक्रवार, ०१ नोव्हेंबर २०२४

# उत्साह तोच, ट्रेंड बदलला

दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' असा लौकिक असलेला दीपोत्सवदेखील त्या आनंदाच्या बदलत्या व्याख्येतून सुटलेला नाही. आजपासून हे प्रकाशपर्व सुरू झाले आहे. त्या निमित्ताने आमच्या सर्व वाचकांना दीपावलीच्या खूप खूप शुभेच्छा. दीपावली म्हणजे दिवे उजळून, फराळ करून कुटुंबीयांसमवेत घरात राहून साजरा करण्याचा उत्सव. पण गेल्या काही काळात त्याचे स्वरूप बदलत आहे. कोणी आपल्या कुटुंबासमवेत सण साजरा करीत आहे तर कोणी आदिवासी पाड्यात दिवाळी साजरी करतोय, कुणी याच हक्काच्या सुट्ट्यांना पर्यटनाला जातंय, तर कुणी जुन्या मित्र-मैत्रिणींसोबत कट्ट्यावर भेटतंय तर कुणी दिवाळी पहाटच्या सुरांत रमतंय. एकूणच हे बदलते पर्व आणि त्याचा माहोल हा दखल घेण्याजोगा आहे. दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव. चिंता-विवंचनांची जळमटं कायमची झाडून टाकून आनंदाचे आकाशदिवे झगमगत ठेवणारा सण. सर्व प्रकारचा अंधार मागे सारत उज्ज्वल प्रकाशाच्या दिशेने आपली वाटचाल व्हावी, असा त्यामागचा अर्थ आहे. पूर्वी पासून गांव खेड्यात घरासमोर प्रसन्न तेज असलेली पणती, आकाशकंदील किंवा चांदणी लावण्याची प्रथा असून ती काही ठिकाणी अजूनही कायम असली तरी शहरी तोंडावळा बदलला आहे. पूर्वी शहर किंवा गावाच्या वेशीवर तळ टाकलेल्या बुरुडांकडून चांदणीसाठी बांबूच्या कामट्या आणल्या जायच्या. घरगुती कंदिलांची ही परंपरा आता जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. सध्या रेडिमेडच नव्हे तर, थेट चायनीज मार्केटमधून आलेले कंदील दारोदारी उजळताना दिसतात. दारातील पणत्यांची जागा चायनीज कॅण्डलने घेतली आहे. संगीताच्या तालावर उघडझाप करणारी १०० -१५० रुपयांची चायनीज तोरणं असंख्य घरांसमोर प्रकाश अंधाराचा खेळ करत नाचू लागली आहेत. प्रकाशाचा सण असा शब्दशः अर्थ घेत शेकडो वॉट्सची उधळपट्टी बिनदिक्कतपणे सुरू आहे. आपल्या संस्कृतीत सण आणि उत्सवांची परंपरा तशी फार जुनीच. हवामानातील आणि निसर्गातील बदलांनुसार साजऱ्या केल्या जाणाऱ्या सण-उत्सवांचं मूळ कारण म्हणजे हे सगळे बदल लक्षात घेऊन, आप्तेष्टांशी 'शेअरिंग' वाढवणं. पूर्वीच्या काळात लोकसंख्या तुलनेनं कमी असल्यानं सण-उत्सव साजरे करणं सोपे होतं. पण आजकालच्या वाढत्या उद्योगधंद्यांमुळे अथवा लाइफस्टाइल, किंवा लोकांच्या बदलत्या गरजानुसार म्हणा, एकूणच या सण-उत्सवांमध्ये मॉडिफिकेशन्स यायला लागले आहे. या सण-उत्सवांचं मूळ कारण हे समाधान हे जरी असलं तरीसुद्धा गेल्या काही वर्षांपासून वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरांमध्ये मॉडिफिकेशन्स करून एस्थेटिक व्हॅल्यूज जपत सण साजरे केले जाताहेत. बदलत्या लाइफस्टाइलमुळे आप्तेष्टांना वेळ देणं जमत नसलं तरी सण-समारंभांनिमित्त नात्यांना टिकवण्याची परंपरा चालू आहे. पण कुठे तरी पूर्वी दिवाळी म्हटलं की घरी बसून, नातेवाइकांना भेटून साजरा केला जाणारा सण ही पद्धत दिसून यायची. अजूनही काही घरात ही परंपरा पाळली जाते. दिवाळीच्या दिवशी घराला कुलूप लावून कुठे जायचं नाही, सगळ्यांनी घरात थांबायचं, असा प्रघात पाळला जातो. पण काही घरांमध्ये मात्र बदलत्या लाइफस्टाइलमुळे, सामाजिक जागरूकतेमुळे किंवा एकूणच बदलत्या प्रायोरिटीमुळे हा ट्रेंड बदलत असल्याचे जाणवते. आज करिअरच्या चक्रात अडकलेल्या गृहिणींना तेवढा वेळ काढणं अशक्य झालं आहे. त्यामुळे असंख्य घरांमध्ये विकतचा फराळ दाखल होऊ लागलाय. आपल्या खाद्यसंस्कृतीत झालेल्या आमूलाग्र बदलांमुळे लोकांची रुचीसुद्धा बदललेली आहे. त्यामुळे एकेकाळी लज्जतदार आणि हव्याहव्याशा वाटणाऱ्या दिवाळी फराळाची चव पूर्णपणे बदलली आहे. त्यामुळेच चायनीज आणि चॉकलेट चकली, तिखट किंवा बेक्ड करंजी, शुगर फ्री शंकरपाळीसह चक्क पंजाबी चवीचा फराळही बाजारात हातोहात खपतोय. पूर्वी लहान मुलं चिखलमातीचा खेळ करत किल्ले उभारायचे. आम्ही रायगड करतो, तुम्ही सिंहगड करा, अशी स्पर्धा रंगायची. मेथीच्या बिया टाकून किल्ल्यावर हिरवाई फुलवणे, स्टोव्हच्या निप्पलच्या साहाय्याने किल्ल्या खालच्या तलावात कारंजी उडवणे, त्यासाठी चक्क सलाईनच्या बाटल्या लावणे यासारख्या कल्पना मुलं लढवायची. बालवयातल्या तेव्हाच्या आनंदाची पर्वणी संपून आता मुलांना 'रेडिमेड' आनंद देण्याचा प्रयत्न पालकांकडून होताना दिसतोय. यंदाच्या वर्षी चक्क रेडिमेड किल्ले बाजारात आले आहेत. घरातल्या बाल्कनीत हे विकतचे किल्ले ठेवून आता पुण्यासारख्या शहरांमध्ये आकाशकंदील, इको फ्रेंडली किल्ले करण्याच्या खास कार्यशाळा भरवल्या जातात. अर्थात ही शिकवणी फुकट नसतेच. ठिपक्यांच्या रांगोळ्यांची जागा डिझायनर चाळणीच्या तयार रांगोळ्यांनी घेतली आहे. हाताच्या मुठीने काढल्या जाणाऱ्या लक्ष्मीची पावलं स्टीकर्सच्या स्वरूपात दारोदारी चिटकवली जाऊ लागली. माव्याच्या मिठाईची जागा ड्रायफ्रूटच्या डिझायनर्स मिठाई आणि इम्पोर्टेड चॉकलेट्सनी घेतली. सोन्याचा वर्ख आणि चांदीची पावडर असलेली मिठाई बाजारात आली आहे. श्रीमंतांचे नाविन्याचे चोचले पुरवण्यासाठी किमती व्हीआयपी मिठाईलासुद्धा बरीच मागणी असते. पूर्वी खास शुभेच्छापत्रं तयार करून ती पोस्टाने आप्तस्वकीय आणि मित्रमंडळींना पाठवली जायची. त्यांची जागा मोबाईलवरच्या एसएमएस आणि व्हॉटसअॅपच्या फॉरवर्डेड पोस्टने घेतल्या आहेत. विशेष म्हणजे रोजची ऑनलाइन खरेदी करूनही या सणाला नवी साडी, नवा शर्ट, नवा टीव्ही, कार, फ्रीज, वॉशिंग मशीन आणि सोनं खरेदी केलंच पाहिजे पाहिजे, असा जणू काही नियम आहे असे मानून लोक झपाटल्यागत खरेदीसाठी रस्त्यांवर उतरल्याचे चित्र गेल्या दोन ते तीन दिवसांत सर्वत्र दिसून आले. एकीकडे जागतिक मंदीचा काळ असला तरी परंपरा, संस्कृतीच्या नावाने हा खरेदी उत्सव मात्र तेजीत आहे. ऋण काढून सण साजरा करण्याची परंपरा मात्र त्यातून जपली जातेय. फटाक्यांची डोकेदुखीसुद्धा गेल्या काही वर्षांपासून वाढलेली आहे. अमुक एका आवाजापेक्षा जास्त आणि तमुक एका वेळेनंतर फटाके फोडू नयेत, असे नियम असले तरी, सारे सरकारी नियम मोडून रस्तोरस्ती सांस्कृतिक अतिरेक्यांचे बॉम्बस्फोट सुरू असतात. मोठे फटाके फोडल्याने मोठा आनंद मिळतो, असा या लोकांचा दृढ समज आहे. मात्र गेल्या दोन-तीन वर्षांपासून आवाजी फटाके कमी झाले असून आकाशात सप्तरंगाची उधळण करणाऱ्या आवाजविरहीत फटाक्यांची मागणी वाढत चालली आहे. असे असले तरी त्यामुळे वायूप्रदूषण वाढत असून त्याकडे वेळीच गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. आनंद साजरा करण्यापेक्षा तो व्हर्चुअली मानण्याची सवय नव्या तंत्रज्ञानाच्या सो कॉल्ड क्रांतीने आपल्याला लावली आहे. दरवर्षी आनंदाच्या व्याख्येशी नवं समीकरण जोडलं जात आहे आणि एक एक जुनी परंपरा विसरत चालली आहे. अर्थात काळानुसार सण साजरा करण्याची पद्धत बदलणं आणि आनंदाची समीकरणेही बदलणे साहजिकच आहे. कारण बदल स्वीकारत मार्गक्रमण करणं, हा समाजाचा स्थायीभाव आहे. खुली अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण या दोन शब्दांनी आपल्या आनंदाच्या व्याख्येची सीमारेषा हद्दपार केली आहे. रस्ते, हॉटेल, मॉलमध्ये धम्माल करीत हुंदडणे, दिखाऊपणासाठी महागड्या आणि ब्रँडेड वस्तूंची खरेदी करणे म्हणजे आनंद अशी वृत्ती आजच्या नव पिढीमध्ये दृढ होत चालली आहे. पारंपरिक आनंदाची समीकरणेही त्यामुळे विस्कळीत झाली. पण असे असले तरी हा सण साजरा करण्याचा उत्साह कायम आहे, फक्त तो साजरा करण्याचा ट्रेंड बदललाय.

# मतदारसंघ हा 'आमदार/खासदारसंघ' नाही !

योगेश वसंत त्रिवेदी





श्री. नंदलाल, माजी आयुक्त
राज्य निवडणूक आयोग,
*माजी सदस्य भारत परिसिमन आयोग*

भारतातील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना भारत परीसिमन आयोग (डीलिमिटेशन कमिशन ऑफ इंडिया) च्या माध्यमातून करण्यात आली. या नवीन मतदारसंघांच्या पुनर्रचनेनुसार २००९ पासून लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येत आहेत. महाराष्ट्राच्या राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन आयुक्त नंदलाल हे भारत परीसिमन आयोगाचे सदस्य होते. त्यांच्यासमवेत ज्येष्ठ पत्रकार वसंतरावदादा देशपांडे आणि मी नेहमी चर्चा करीत असू. नंदलाल हे अत्यंत परखड, प्रामाणिक आणि सच्चे सनदी अधिकारी म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांनी मतदारसंघांबद्दल परखडपणे स्पष्ट केले होते. मतदारसंघ हा मतदारांसाठी असलेला मतदारसंघ आहे, तो कुणाच्या सातबाऱ्यावर दिलेला नाही. तो आमदार संघ नाही की खासदार संघ नाही. त्यामुळे कुणाच्या मनात हा मतदारसंघ माझ्या बापजाद्यांपासून मला आंदण दिलेला आहे, असा समज कृपया, कुणी करुन घेऊ नये. या भारतात एक मतदान केंद्र असे आहे, ज्या क्षेत्रात एकच मतदार आहे, दोन तीन मतदारांसाठी सुद्धा मतदान केंद्रे निवडणूक आयोगाने तयार केली आहेत. मतदारांच्या सुविधेसाठी निवडणूक आयोगाकडून अनेक बाबी, उपाययोजना करण्यात येतात. वयोवृद्ध, गर्भवती महिला, दिव्यांग अशा मतदारांसाठी इमारतींच्या तळमजल्यावर मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. आता तर पंचाहत्तरी नंतर च्या ज्येष्ठ मतदारांना आपापल्या घरुन मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान सर्वाधिक व्हावे, शंभर टक्के व्हावे म्हणून यापूर्वी अनिल काकोडकर, माधुरी दीक्षित नेने, राही सरनौबत, प्रशांत दामले, मृणाल कुलकर्णी, गौरी सावंत, निशिगंधा वाड, ललिता बाबर, वीरधवल खाडे, मधु मंगेश कर्णिक, स्मृती मानधना, उषा जाधव, यांच्यासह अनेक नामवंतांमार्फत जागृती करण्यात आली आहे, याचे कारण मतदाराला मतदार राजा म्हणून संबोधण्यात येते. आजकाल एखाद्याला उमेदवारी दिली नाही तर तो बंडाचा झेंडा घेऊन उभा राहतो. अथवा विशिष्ट मतदारसंघासाठी हट्ट धरण्यात येतो. अशावेळी भारत परीसिमन आयोगाचे सदस्य आणि राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन आयुक्त नंदलाल यांचे हे परखड मत महत्वाचे ठरते. नंदलाल हे शिस्तप्रिय अधिकारी, कर्तव्य कठोर अधिकारी म्हणून




ओळखले जातात. म्हणूनच त्यांचा राज्यकर्त्यांशी खटका उडत असे. याचे परिणामही नंदलाल यांना भोगावे लागले. 2009 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पुनर्रचित मतदारसंघानुसार घेण्यात आल्या. हे मतदारसंघ पुनर्रचित करतांना भारत परीसिमन आयोगाने देशातील प्रत्येक मतदाराचा विचार केला. यासंदर्भातील माहिती नंदलाल यांनी सांगतांना आपल्याकडे देशात एक एक दोन दोन मतदारांसाठी मतदान केंद्रे बनविण्यात आली असल्याचे आवर्जून नमूद केले. महाराष्ट्रात विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असतांना नंदलाल हे राज्य निवडणूक आयुक्त होते आणि लातूर हा विलासराव देशमुख यांचा मतदारसंघ. विशेष म्हणजे लातूर लोकसभा मतदारसंघ भारत परीसिमन आयोगाने राखीव म्हणून जाहीर केला. विलासराव देशमुख यांना तो राखीव ऐवजी सर्वसाधारण मतदारसंघ हवा होता. डॉ. पतंगराव कदम आणि बाळासाहेब थोरात हे विलासरावांचे निकटवर्तीय नेते. हे नेते नंदलाल यांच्याशीही चांगले संबंध ठेवून होते. त्यामुळे बाळासाहेब थोरात आणि डॉ. पतंगराव कदम यांनी विलासरावांसाठी नंदलाल यांच्याकडे रदबदली केली. तेंव्हा नंदलाल यांनी भूमिका स्पष्ट केली. मतदारसंघ हे मतदारसंघ आहेत, मतदारांसाठी आहेत आणि मतदार हा राजा आहे. एखादी व्यक्ती एखाद्या मतदारसंघातून निवडून आली म्हणजे तो काही त्याच्या मालकीचा होत नाही. राजकीय नेत्यांनी ही गोष्ट मुद्दामहून ध्यानात ठेवावी. नंदलाल यांची ही भूमिका महत्त्वाची आहे आणि आज आपल्या लोकशाहीत सर्वांसाठी महत्त्वाची आहे. लोकसभेच्या/विधानसभेच्या एकेका जागेवरुन जे वाद उफाळून येत आहेत त्या पार्श्वभूमीवर नंदलाल यांची भूमिका महत्त्वाची आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली होती. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.

**दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!**

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत. गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### तर पुढचा मुख्यमंत्री मनसेचा असेल

महाराष्ट्रातील सत्ता काबीज करण्यासाठी वेगवेगळे राजकीय समीकरण जनतेला अलीकडे बघायला मिळालेले आहे. एकीकडे शिवसेनेचे दोन गट तेही विरुद्ध विचारधाराऱ्यानी दोन वेगवेगळ्या नेतृत्वाखाली तर दुसरीकडे वरिष्ठ लोकनेते असलेले खा.शरदचंद्र पवार याना स्वतःचा पक्ष स्वतःच्या डोळ्यासमोर हातातून निसटून जाताना पहावे लागत आहे अशी विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. मागील निवडणूकीत म्हणजे लोकसभेत मनसेनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा दिला होता आणि आता देखील विधानसभेच्या निवडणूकीत साथ देतील अशीच परिस्थिती आहे. शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री राहिलेले उद्धव ठाकरे आणि एकनाथराव शिंदे ही नावे यापुर्वी कधीच सीएम पदाच्या शर्यंतीत नव्हती. मुंबईतील दादर माहीम भागातून मनसेकडून अमित राजसाहेब ठाकरे याना उमेदवारी दिल्यामुळे आणि सोबत दोनडझन मनसेचे आमदार निवडून आले तर कदाचित् अमित ठाकरे यांच्या निमित्याने राज्याला दुसऱ्यांदा ठाकरे परिवारातीलच दुसरा मुख्यमंत्री मिळण्याची शक्यता नक्कीच आहे असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### धरण सुरक्षेत्रांकडे लक्ष देण्याची नितांत गरज

महाराष्ट्रात देशात सर्वात जास्त म्हणजे १८२१ धरणे आहेत. या धरणावर अनेक शहरातील पाणी पुरवठा योजना, तसेच अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे पाणी या धरणातून दिले जाते . यामुळे अनेक उद्योग निर्माण झाले .महाराष्ट्राला वीज पुरवठा करणाऱ्या कोयना दक्षिण महाराष्ट्राला एक नवे जीवन मिळाले आहे . राष्ट्रीय उत्पन्नात भर घालणाऱ्या उजनी, गोसीखुर्द, जायकवाडी, इत्यादी धरणाच्या देखभाल दुरुस्तीसाठी राज्य सरकारकडून आखडता हात घेतला जातो आहे . पाणी पट्टीच्या मर्यादित तुटपुंज्या निधीतून या धरणाची दुरुस्तीला योग्य असा निधी मिळत नाही . पुरेशा दुरुस्ती अभावी अनेक धरणांची सुरक्षितता धोक्यात आली आहे . ही बातमी नुकतीच वाचली .पाणी पट्टीचे दर सवलतीचे असे धोरण आहे . सर्वसाधारण पणे पाणीपट्टी १७०० ते १८०० कोटी रुपयांची वसूल होते . त्यापैकी २०० कोटी रुपये शेतकरी तर उधोग, घरगुती वापरातून इतर पाणी पट्टी वसूल होते . धरणाच्या देखभालीसाठी जेवढी पाणीपट्टी त्या रकमेच्या मर्यादेत धरणाची दुरुस्ती करावयाची असे ठरले आहे . एकट्या उजनी धरणांचे उदाहरण घेतल्यास उजनीतून पाणीपट्टी पायी ६० कोटी रुपये वसूल होतात . पण दुरुस्ती साठी फक्त २५ कोटी रुपये खर्च केले जातात. याबरोबरच धरणाच्या दुरुस्ती साठी आवश्यक असणारे गेट ऑपरेटर कामगार इत्यादी लोकांची भरती आता बंद झाली आहे . एकूणच धरणाच्या दुरुस्ती व देखभाली साठी सरकारचे लक्ष कमी आहे असे दिसते . वास्तविक विकास कामासाठी पैसा य योग्य त्या प्रमाणात उपल्बध करून दिला पाहिजे . ते ना करता सरकार लोकोपयोगी योजनांना हात घालते . व त्यावर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात यावर आता विचार करण्याची वेळ आली आहे .आता विधासभेच्या निवडणुका होत आहेत . निवडून येणारे नवीन प्रतिनिधी तरी या प्रश्नाकडे लक्ष देतील का ?

**- शांताराम वाघ, पुणे**

### बेस्ट कर्मचारी यांच्या बोनस बाबत दुजाभाव का?

मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळीनिमित्त २९ हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय मनपा प्रशासना मार्फत घेण्यात आला. महापालिका अधिकारी- कर्मचाऱ्यांप्रमाणेच बेस्ट कर्मचाऱ्यांना सुद्धा बोनस मिळावा यासाठी विविध कामगार संघटना यांनी पत्र व्यवहार करून थांबले नाहीत तर प्रत्यक्षात संबंधित महाव्यवस्थापक आणि अधिकारी यांच्या बैठका घेतल्या बेस्ट उपक्रमाने दिवाळी बोनस करता मुंबई महापालिकेकडे निधी मागितला होता. मात्र निवडणूक आचारसंहितेमुळे निधी देता येत नसल्याचे कारण मनपा ने स्पष्ट केल्याने यंदाची बेस्ट कर्मचाऱ्यांची दिवाळी बोनसविना झाली आहे. बोनस देण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून बुधवारी दिवसभर निधीची जुळवाजुळव सुरूच होती आणि यासाठी बैठका होत होत्या. यंदा मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचारी, अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक चे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, महापालिका प्राथमिक शाळेतील तसेच अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवक, माध्यमिक है. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी (अनुदानित आणि विनाअनुदानित), माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवक, अध्यापक शाळेतील शिक्षण सेवक, अध्यापक विद्यालय अधिव्याख्याते आणि शिक्षकेतर कर्मचारी, अध्यापक विद्यालय शिक्षण सेवक यांना २९ हजार रुपये बोनस मिळाला. गेल्या वर्षी अधिकारी, कर्मचाऱ्यांना २६ हजार रूपये बोनस दिला होता. यंदा यामध्ये वाढ करण्यात आली. सामाजिक आरोग्य स्वयंसेविकांना १२ हजार रुपये, तर बालवाडी शिक्षिका, मदतनीस यांना प्रथमच भाऊबीज भेट आचारसंहितेमुळे महापालिकेकडून निधीच कमतरता असताना सुद्धा देताना पाच हजार रुपये देण्यात आले. मुंबई महानगर पालिका मोठा भाऊ तर बेस्ट प्रशासन छोटा भाऊ असे वर्षानुवर्षे चालत आले आहे. वेळ प्रसंगी बऱ्याच वेळेस बेस्ट कामगारांच्या हितार्थ निर्णय मुंबई महानगर पालिकेने घेतले आहेत.मुंबई महापालिकेप्रमाणेच बेस्टच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही दरवर्षी बोनस मिळतो आणि हा बोनस यावेळी मिळावा, अशी मागणी बेस्ट उपक्रमाच्या अधिकारी, बेस्ट मध्ये कार्यरत असलेल्या विविध कामगार संघटना / कर्मचाऱ्यांकडून केली जात होती. आठवड्याभरापूर्वीच बेस्ट महाव्यवस्थापक श्री. अनिल डिग्गीकर साहेब यांनी मनपा आयुक्त श्री. भूषण गगाराणी साहेब यांच्या समवेत बैठक केली आणि बेस्ट उपक्रमाला मुंबई महापालिकेने ८० कोटी रुपये बोनस निधीची मागणी केली होती. त्यामुळे बोनसची कर्मचाऱ्यांना प्रतीक्षा होती. बेस्ट कर्मचारी कुटुंब आपली दिवाळी गोड होईल या करता आशेवर होते परंतु त्यांच्या आशेवर पाणी फेरले गेले की काय असे वाटू लागले. मुंबई मधल्या सर्वच बेस्ट वसाहती मध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला. दरवर्षी दिवाळीच्या आदल्या दिवशी बोनस कर्मचारी यांच्या बँक खात्यात जमा होतो. मात्र बुधवारपर्यंत बेस्ट कर्मचाऱ्यांचा बोनस झालाच नाही. महापालिकेची असमर्थता विधानसभा आचारसंहिता निवडणुकीमुळे लागू झाली आहे. आचारसंहितेमुळे निधी उपलब्ध करू शकत नसल्याचे महापालिकेकडून सरळ रित्या बेस्टला कळवण्यात आले. बोनससाठीचा हा निधी आचारसंहितेनंतर देण्याचा विचार करू, असेही महापालिकेने ओपचारिक पणे बेस्टला स्पष्ट केले. त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांची दिवाळी यंदा बोनसविनाच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बेस्टमध्ये सध्या २५ हजारपेक्षा जास्त अधिकारी, कर्मचारी आहेत. बेस्ट कर्मचारी आणि कुटुंबियांच्या बिना बोनस दिवाळी ला जवाबदार कोण ? असा संतप्त सवाल बेस्ट कर्मचारी आणि कुटुंबिय करत आहेत. सध्या सुरु असलेल्या राजकीय पडघमीत काही वेगळे पडसाद उमटले नाही म्हणजे झाले.

**- नितीन कदम** ■

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, शुक्रवार, ०१ नोव्हेंबर २०२४

## सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधींना पालिकेमार्फत अभिवादन

**नवी मुंबई :** थोर स्वातंत्र्यसेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि माजी पंतप्रधान प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नमुंमपा मुख्यालयातील ॲम्फीथिएटरमध्ये समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. किसनराव पलांडे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून या महामानवांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ तसेच दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त भ्रष्टाचार निमुर्लनाची शपथ सामुहिकरित्या ग्रहण करण्यात आली.



### म ह त्त्वा चे

## कचरा कोंडीवर पालिकेचा तोडगा

**ठाणे :** दिवाळी सणांत फराळासोबतच एकमेकांना मिठाईद्वारे शुभेच्छा देण्यात येतात. त्यामुळे दिवाळी सणात सर्वाधिक खप हा मिठाईचा होत असतो. मिठाईच्या बॉक्सच्या होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावायची कशी, असा पेच पालिके समोर आहे. आता यावर ठाणे महापालिकेने तोडगा काढला आहे. तीन संस्थांच्या माध्यमातून ठाण्यात ज्या-ज्या ठिकाणी हा कचरा निर्माण होणार आहे. या संस्थेतील पदाधिकारी सुका कचरा गोळा करणार असल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाने दिली आहे. या कालावधीत २५० मेट्रिक टन कचऱ्याची निर्मिती होईल, असा अंदाज बांधला आहे.. मागील काही दिवसांपासून ठाणे शहरात कचरा कोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. अशातच या कचऱ्याची विल्हेवाट लावताना पालिकेला तारेवरची कसरत करावी लागत आहे. आता दिवाळीच्या सणात प्रत्येकाच्या घरी मिठाईचे बॉक्स येत आहेत, तसेच विविध संस्था, नेते, विकसक किंवा इतर मित्र मंडळींकडूनदेखील अशाच पद्धतीने मिठाईचे बॉक्स प्रत्येकाला दिले जात आहेत. त्यामुळे त्यातून निर्माण होणारा सुका कचरा ही मोठी समस्या होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. यावर उपाय म्हणून संस्थांच्या माध्यमातून ठाण्यातील २५ हजार कुटुंबाकडून हा कचरा गोळा केला जाणार आहे. यासाठी ठाण्यातील विविध गृहसंकुलाचा सर्व्हेदेखील केला आहे. त्यानुसार कुटुंबाची संख्या महापालिकेने पुढे आणली आहे.

## अलिबाग गाडीला अखेरीस ग्रीन सिग्नल

**श्रीवर्धन :** एसटी महामंडळाकडून बंद केलेली श्रीवर्धन- अलिबाग गाडीला अखेरीस ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. तुयामुळे अलिबाग मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. श्रीवर्धन आगाराची स्थापना १९८७ रोजी झाली. स्थापनेनंतर आगाराकडून मुंबई शहरापासून तळकोकणापर्यंत तर अनेक स्थानिक फेऱ्या सुरू करण्यात आल्या. प्रशासकीय कार्यालयांचे मुख्यालय असणाऱ्या अलिबाग येथे ही अनेक वर्षे नियमित वेळापत्रकानुसार मार्गस्थ होणारी व आर्थिक उत्पन्नात अग्रेसर असणारी अलिबाग गाडी २०१८ रोजी अचानक बंद करण्यात आली. महत्त्वाची कार्यालये अलिबाग येथे असल्याने श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील शासकीय कर्मचारी व शासकीय कार्यालयात वैयक्तिक कामे असणाऱ्या नागरिकांना अलिबाग एसटी उपयुक्त होती. १९८७ ते २०१८ रोजीपर्यंत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणारी गाडी अशी ख्याती असणारी अलिबाग एसटी आर्थिक उत्पन्न कमी असल्याचे सबब देत बंद करण्यात आली.

# गॅस सिलेंडरच्या स्फोटात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू

### दुकानात पेट्रोल, डिझेल विकण्यात येत असल्याचा व्यक्त होतोय संशय

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई परिसरातील उलवेच्या जावळे गावात बुधवारी दिवाळीच्या पूर्व संध्येला गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला आहे. यामध्ये आई मुलगा आणि मुलगी अशा एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत एक व्यक्ती गंभीर भाजल्यामुळे जखमी झाला. त्याला जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्यानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं.



दिवाळीच्या पूर्वसंध्येला दुर्घटना घडल्यानं नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे. उलवे येथील जावळे गावात एका किराणा दुकानात 5 किलोच्या 2 सिलेंडरचा स्फोट झाल्यानं एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. एकीकडं नवी मुंबई शहर आणि परिसरात दिवाळीचा उत्साह सुरू आहे. दुसरीकडं सिलेंडरचा स्फोट झाल्यानं एकाच कुटुंबातील तिघांचा बळी गेला. दिवाळीच्या पूर्वसंध्येला हृदयद्रावक घटना घडल्यानं नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

उलवे येथील जावळे गावात किराणा दुकानात झालेल्या स्फोटाची तीव्रता भयानक होती. त्यामुळे दोघांचा जागीच मृत्यू झाला तर एकानं रुग्णालयात नेताना प्राण सोडला. मृत्यू झालेल्यांमध्ये आईसह दोन मुलांचा समावेश आहे. त्यात 38 वर्षीय महिला, एक 15 वर्षांची मुलगी असून एक 8 वर्षांचा मुलगा आहे. दरम्यान, आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं आहे. स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचली. त्यानंतर आग आटोक्यात आणण्यात आली. या किरणा मालाच्या दुकानात छोटे सिलिंडर विक्रीसाठी ठेवले होते. या दुकानात छुप्या पद्धतीनं पेट्रोलचीही विक्री होत असल्याची माहिती समोर आली आहे. खबरदारीसाठी आजूबाजूची घरं आणि रस्ता प्रशासनामार्फत रिकामा करण्यात आला. या घटनेत तीन मृत्यूसह आणखी एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# ठाणे पोलिसांनो, 23 नोव्हेंबर नंतर सरकार कोणाचे येतेय याची वाट बघा!

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे उद्योग ठाणे पोलिसांकरवी सुरू करण्यात आले आहेत. पोलिसांनी आपल्या कार्यकर्तव्यानुसारच काम करावे. दबावाखाली येऊन कुणाच्याही हातचे बाहुले बनू नये. कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे आपले काम आहे. पकडून आणून कोणालाही बसविणे, हे आपले काम नाही " असा आशयाचा मजकूर ट्विट करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मुंब्रा – कळव्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे पोलिसांवर आरोप केला आहे. तर २३ नोव्हेंबरच्या निकालानंतर सरकार कोणाचे येतेय, याची वाट बघा जरा " असा इशारा देखील त्यांनी पोलिसांना दिला आहे. तर तुम्ही सत्तेत असताना पोलिसांचा किती गैरवापर केला हे विसरलात का असे प्रतिउत्तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ठाणे शहर अध्यक्ष आनंद परांजपे यांनी आव्हाडांच्या ट्विटला केले आहे.

### आव्हाडांचा पोलिसांना इशारा


Dr.Jitendra Awhad
@Awhadspeaks
महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे उद्योग ठाणे पोलिसांकरवी सुरू करण्यात आले आहेत. मी याबाबत स्पष्ट भूमिका घेतोय की, पोलिसांनी आपल्या कार्यकर्तव्यानुसारच काम करावे. दबावाखाली येऊन कुणाच्याही हातचे बाहुले बनू नये. कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे आपले काम आहे. पकडून आणून कोणालाही बसविणे, हे आपले काम नाही. २३ नोव्हेंबरच्या निकालानंतर सरकार कोणाचे येतेय, याची वाट बघा जरा !
@ThaneCityPolice

Anand Paranjpe
@paranjpe_anand
Follow
Replying to @Awhadspeaks
कायदा व सुव्यवस्थेची भाषा करणारे @Awhadspeaks तुम्ही सत्तेत असताना पोलिसांचा किती गैरवापर केलात ते विसरलात का? उदा. अनंत करमुसे ला स्वतःच्या बंगल्यात नेऊन केलेली मारहाण, ठाणे महानगरपालिका अधिकारी महेश आहेर यांना तुमच्या सहकाऱ्यांनी केलेली मारहाण, भाजपा च्या महिला पदाधिकारी रिदा रशीद यांना खोट्या पीटा व पोस्कोमध्ये अडकविण्याचे षडयंत्र.
#चोराच्या_उलट्या_बोंबा

विधानसभा निवडणुकांची प्रचाराची रणधुमाळी सर्वत्र सुरु असताना राजकीय व्यासपीठावरून आपल्या विरोधी उमेदवारावर सर्व नेते मंडळींकडून टीकांची झोड उठवली जाते. तर सध्याच्या समाजमाध्यमांच्या जगात राजकीय नेत्यांकडून एक्स या समाज माध्यमांवरून विविध महत्वाच्या विषयांबाबत आपली भूमिका मांडत असतात. याच पद्धतीने आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे पोलिसांवर ट्विट करून आरोप केला आहे. जितेंद्र आव्हाड मुंब्रा – कळवा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून निवडणूक लढवत आहेत. तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नजीब मुल्ला निवडणूक लढवत आहेत. यामुळे यंदाची निवडणूक अधिक चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे. तर आव्हाड आणि मुल्ला या दोन्ही उमेदवारांकडून प्रचाराचा नारळ देखील फोडण्यात आला असून मतदारसंघात जोरदार शक्तिप्रदर्शन देखील केले जात आहे. असे असतानाचा आता आव्हाड यांनी ठाणे पोलिसांवर महाविकासआघाडीच्या कार्यकर्त्यांना त्रास दिल्याचा आरोप केला आहे.

# कथोरे यांचा अर्ज दाखल करतेवेळी माजी मंत्री कपिल पाटील अनुपस्थित

**प्रतिनिधी**
■ **मुरबाड**

मी भाजपचा एक लहान कार्यकर्ता आहे. सध्या त्यांच्यासाठी मी महत्वाचा नसेल, म्हणून मला अर्ज भरताना बोलवले गेले नाही, अशी प्रतिक्रिया माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या अर्ज भरण्याच्या दिवशी कपिल पाटील कुठेही दिसले नाही. त्याबाबत विचारले असता पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली. मला आमंत्रण दिले तर नक्कीच प्रचारात उतरेल. पण मला कोण आमंत्रण देईल, असा प्रश्नही कपिल पाटील यांनी उपस्थित केला. गेल्या काही वर्षात पाटील आणि कथोरे यांच्यात विसंवाद होता. आता विधानसभेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांना सामोपचाराने वागण्याचा सल्ला दिल्याची माहिती आहे.



लोकसभा निवडणुकीत पराभवानंतर भाजपचे केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी आमदार किसन कथोरे यांच्यावर थेट आरोप केला होता. पराभवाचे खापर कथोरे यांच्यावर पाटील यांनी फोडल्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये विसंवाद वाढला आहे.

# कल्याणमध्ये एकाच नावाच्या दोन उमेदवारांमुळे नेत्यासह मतदारांची डोकेदुखी वाढणार

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

कल्याण पूर्व मतदारसंघाकडे यंदा सगळ्यांचे लक्ष लागून आहे. या मतदारसंघामध्ये भाजपने आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नीला उमेदवारी दिली. त्यामुळे शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर या मतदारसंघात आता महेश प्रकाश गायकवाड यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केलाय. त्यामुळे एकूणच नावात साधर्म्य असलेल्या या उमेदवारांमुळे महेश गायकवाड यांच्यासह मतदारांची डोकेदुखी वाढणार असल्याचे चित्र दिसून येत आहे .

कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्जाची मुदत संपल्यानंतर नवी खेळी समोर आली आहे. भाजपकडून गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली. सुलभा गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिल्यामुळे महेश गायकवाड हे नाराज झाले. त्यांना पक्षाकडून तिकीट मिळेल अशी आशा होती. पण तिकीट न मिळाल्यामुळे विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असणाऱ्या महेश गायकवाड यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला.



गणपत गायकवाड यांच्या नावाशी साधर्म्य असलेला गणपत चिमाजी गायकवाड यांनी देखील अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेनेचे शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला त्यानंतर त्यांच्या नावात साधर्म्य असलेल्या महेश प्रकाश गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे एकाच मतदारसंघामध्ये एकाच नावाचे दोन उमेदवार असल्यामुळे मतदान करताना मतदारांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे.

# निवडणूकांच्या प्रचारात नैना प्रकल्पाला शेतक-यांकडून तीव्र विरोध

### ग्रामस्थांनी अधिका-यांना लावले पळवून



**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना प्रकल्प) ४० गावांमध्ये सिडको महामंडळ रस्त्यांच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या कामांचे ठेके सुद्धा सिडको मंडळाने विविध ठेकेदारांना वाटप केले. नैना स्थापनेनंतर ११ वर्षांनी पहिल्यांदा नैना प्रकल्पात रस्ते व इतर पायाभूत सुविधांचे काम सूरु करण्यासाठी सिडको मंडळाने कंबर कसली असल्याने बुधवारी दुपारी देवद गावामध्ये या कामांची सूरुवात करण्यासाठी ठेकेदार कंपनीचे दोन अधिकारी गावात दाखल झाल्यानंतर अधिका-यांना ग्रामस्थांच्या रोषाचा सामना करावा लागला. जोपर्यंत शेतक-यांचे प्रश्न सिडको मंडळ सोडवत नाही, तोपर्यंत नैना प्रकल्पाचे एकही काम सूरु होऊ देणार नाही.

असा पवित्रा संतप्त शेतक-यांनी घेतल्याने ठेकेदार कंपनीच्या अधिका-यांना काम न करता परतावे लागले. विधानसभा निवडणूकांच्या प्रचारात नैना प्रकल्पाला शेतक-यांकडून तीव्र विरोध होत आहे. देवद गावात भाजपच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी आक्रमक भूमिका घेतल्याने काही वेळेसाठी तणावाचे वातावरण पसरले होते. या सर्व स्थितीमुळे नैना प्रकल्पाचे काम रखडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

पनवेल तालुक्यातील गावांमधील शेतक-यांचा नैना प्रकल्पाला विरोध आहे. शेतक-यांची जमीन सिडको मंडळाने २०१३ सालच्या कायद्यानूसार संपादीत करावी आणि नैना प्रकल्प उभारावा म्हणजे शेतक-यांना जमीनीचा चांगला मोबदला मिळेल असा सूर शेतक-यांमध्ये ऐकायला मिळतो.

# डोंबिवलीत पदपथावरील फटाके स्टॉल काढण्यास सांगितल्याच्या रागातून रहिवाशाला बेदम मारहाण

■ **डोंबिवली**

पदपथावर फटाके विक्री मंच लावल्यामुळे पादचाऱ्यांना येण्यास जाण्यास त्रास होतो. त्यामुळे फटाके विक्री मंच काढण्याची सूचना एका विक्रेत्याला करताच, विक्रेत्याने आपल्या तीन मित्रांच्या मदतीने रहिवाशाला आपल्या कार्यालयात नेऊन बेदम मारहाण केली आहे. या मारहाणीत या रहिवाशाच्या डोळ्याला दुखापत झाली आहे.



डोंबिवली पश्चिमेतील महात्मा फुले रस्त्यावर कल्याण डोंबिवली पालिकेच्या ह प्रभाग क्षेत्राच्या हद्दीत हा प्रकार रविवारी रात्री घडला आहे. विष्णुनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी जखमी झालेले रहिवासी नितीन ढवळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चार जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. ढवळे भोईरवाडी परिसरात राहतात.

रविवारी रात्री तक्रारदार नितीन ढवळे एका पोळीभाजी केंद्रात पदपथावरून चालले होते. त्यावेळी विलास बेळंके यांच्या इस्टेट एजन्सी कार्यालयासमोरील पदपथावर विलास यांचा मुलगा अथर्व बेळंके (कोल्हापुरे) यांनी दिवाळी निमित्त फटाके विक्रीचा मंच लावला आहे. फटाके विक्री मंचामुळे पदपथ व्यापला आहे. यामुळे नागरिकांना येथून येण्यास अडथळा होत असल्याचे आणि मंच तेथून काढण्याची सूचना नितीन ढवळे यांनी विक्रेते अथर्व यांना केली.

# ठाणे, डोंबिवलीमध्ये दिवाळी पहाटचा जल्लोष



**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

डोंबिवलीचे ग्रामदैवत गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन डोंबिवलीकर फडके रोडवर दिवाळी पहाटनिमित्त एकमेकांना शुभेच्छा देतात विविध सामाजिक संस्था राजकीय पक्षांकडून या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अनेक मंडळ तसेच संस्थाकडून भव्य दिव्य रांगोळया देखील काढल्या जातात वर्षगणिक दिवाळी पहाटचा उत्साह डोंबिवलीकरामध्ये वाढलेला पाहायला मिळतोय.

आज देखील दिवाळीच्या निमित्ताने डोंबिवलीमध्ये पहाटे फडके रोडवर हजारो तरुण-तरुणी आलेत. फडके रोड तरुणाईने फुलून गेलाय. सेल्फी पॉईंटवर फोटो काढताना दिसत आहेत. एकमेकांना शुभेच्छा देत आहेत. फडके रोजवर गणेश मंदिर संस्थातर्फे, खासदार श्रीकांत शिंदे यांच्यातर्फे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हजारो डोंबिवलीकर फडके रोडवर आले आहेत.

दिवाळीनिमित्त ठाण्यात तलाव पाली राम मारुती रोड या ठिकाणी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात तरुणाई एकत्र येऊन दिवाळी पहाट साजरी करत असते. तर शुभेच्छा देत असतात गेल्या काही वर्षात प्रत्येक राजकीय पक्ष या दिवाळी पहाट कार्यक्रमचे आयोजन करतात आणि ठाणेकर या दिवाळी पहाटसाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

# उल्हासनगरमध्ये निवडणूक कमिशनिंग मशीनचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघाअंतर्गत दिनांक ३१/१०/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता नवीन प्रशासकीय इमारत, पवई चौक, उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर येथे EVM व VVPAT कमिशनिंग मशीनचे प्रथम प्रशिक्षण पार पडले.



सदर प्रशिक्षण हे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा तसेच नायब तहसिलदार प्रशांत कुमावत व अमित बनसोडे यांनी दिले असून सदर प्रशिक्षणास सर्व संबधित अधिकारी कर्मचारी व शिपाई उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांकडून कुटूंबांपर्यंत पर्यावरण रक्षणाचा संदेश

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

महापालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक कुटूंबांपर्यंत पर्यावरण रक्षणासाठी पालिकेने अनेक पाऊले उचलली आहेत. यंदाची दिवाळी पर्यावरणपूरक साजरी प्रत्येक कुटूंबामध्ये साजरी करावी यासाठी महापालिकेने विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी माझी वसुंधरा ५.० या योजनेअंतर्गत पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच कामोठे येथील रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम विद्यालयातील



विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी मुलांनी काय करावे असे विविध पर्याय मुलांना सूचविण्यात आले. तसेच पर्यावरण विषयावर विद्यार्थ्यांमध्ये रांगोळी स्पर्धा व पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविण्याच्या स्पर्धा घेण्यात आली. यावेळी रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवाळीच्या दरम्यान फटाके उडवल्याने मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण वाढते. त्यामुळे श्वसनदाह आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या सूचनेनूसार हरित सण अंतर्गत फटाकेमुक्त दिवाळी, प्रदूषण मुक्त दिवाळी विद्यार्थ्यांनी साजरी करावी यादृष्टीने ही जनजागृती पालिकेने केली आहे. विद्यार्थ्यांनी पुनर्वापर करण्यात येणाऱ्या वस्तू पासून पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनवून दाखवले.

# मध्यरात्री उल्हासनगर विधानसभा मतदार संघात 17 लाखांची रोकड जप्त

### भरारी पथकाची तपासणीची कारवाई

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजयानंद शर्मा यांनी आदर्श आचारसंहितेच्या पालनासाठी उल्हासनगर विधानसभा मतदार संघात नेमलेल्या भरारी पथकाने मध्यरात्री केलेल्या धडक तपासणीच्या कारवाईत 17 लाख रुपयांची संशयास्पद रोकड जप्त केली आहे. या रोख रकमेसंदर्भात कोणताही वैध पुरावा नसल्याने ही कारवाई निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी महत्त्वाची ठरली असून या रकमेची आयकर विभागाच्या माध्यमातून तपासणी सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,31 ऑक्टोबरच्या मध्यरात्री साधारण दोन वाजण्याच्या सुमारास भरारी पथकाला कल्याणकडून मुरबाडच्या दिशेने जात असलेले MH05 DZ9911 हे वाहन संशयास्पद वाटल्याने त्यास थांबविण्यात आले. वाहन थांबवून तपासणी केली असता, मोठी रोख रक्कम आढळली. आश्चर्य म्हणजे, वाहन चालकाकडे या रकमेसंदर्भात कोणताही वैध पुरावा नसल्याने ती रोख रक्कम त्वरित जप्त करण्यात आली. तपासणीच्या वेळी आढळलेल्या रोख रकमेची मोजणी केल्यावर ती 17 लाख रुपये असल्याचे समोर आले.



जप्त केलेली रक्कम कोषागारात जमा करण्यात आली असून, याबाबतचा तपास आयकर विभागाला देण्यात आला आहे. आयकर विभागाच्या माध्यमातून या रकमेसंबंधी सखोल तपासणी सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे रोख रक्कम आणि आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली 8 भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये भरारी पथक क्र.6 ने कालच्या कारवाईत मिळवलेल्या यशामुळे आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यास हातभार लागला आहे. प्रशासनाने जनतेसह सर्व उमेदवारांना आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## नदी काठावर सापडली 800 आधारकार्ड, पोलिसांनी केली जप्त

**नागपूर :** मागील काही वर्षांपासून वितरित करण्यात आलेले जवळपास ८०० आधारकार्ड नदीच्या काठालगत फेकून देण्यात आल्याचा प्रकार नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून आधारकार्ड जप्त करत पुढील तपासास सुरवात करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील वानाडोंगरी परिसरातील वेणा नदी काठावरील परिसरात आधारकार्ड फेकलेले स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. स्थानिक नागरिकांच्या सदरची बाब लक्षात आल्यावर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली होती. यानंतर पोलिसांनी लागलीच घटनास्थळी येत स्पॉट पंचनामा करत फेकलेले आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे जप्त केले आहेत. यानंतर याचा तपास करण्यास सुरवात केली आहे. दरम्यान पोलिसांनी केलेल्या तपासात सदरचे आधारकार्ड वानाडोंगरी पोस्ट ऑफिसमधून वितरित न केलेले आधार कार्ड असल्याची माहिती मिळाली.



# मराठा - दलित - मुस्लिम एकत्र येण्यावर एकमत; 3 तारखेला मतदारसंघ तसेच उमेदवारांची घोषणा

**प्रतिनिधी**
**■ जालना**

अंतरवाली सराटीमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी अंतिम निर्णय काय असावा याविषयी बैठक घेण्यात आली. यावेळी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी प्रसार माध्यमांसोबत संवाद साधला आहे. आजची आमची बैठक ही मराठा, मुस्लिम आणि दलितांचे समीकरण जुळवण्यासाठी आयोजित केलेली बैठक आहे. तसेच आजचा दिवस आमच्यासाठी महत्त्वाचा असून या बैठकीत समीकरण जुळले तर गोरगरीब



जनता सत्तेत येणार असल्याचे जरांगेंनी यावेळी म्हटले आहे. तसेच 3 नोव्हेंबरला आम्ही उमेदवारांचा निर्णय घेणार आहोत, असे देखील यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. मी देवेंद्र फडणवीस यांना सांगितले होते, की गोरगरिबांना हलक्यामध्ये घेऊ नका. तसेच मला यांच्या दहशतीतून मराठा समाज वाचवायचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. अन्यायाचे संकट आम्हाला परतवून लावायचे आहे. आता आम्हाला गुलामगिरीत जगायचे नाही. तसेच आम्ही बंजारा समाज आणि ओबीसी समाजासोबतही चर्चा करणार आहोत. तसेच यावेळी कोणत्या जागा लढवायच्या आणि किती जागा लढवायच्या याबाबत पुढील तीन तारखेला निर्णय घेणार असल्याचे देखील ते म्हणाले आहेत. आम्ही सर्व जागा लोकशाही मार्गाने लढवणार. कोणाचीही दादागिरी चालू देणार नाही असे जरांगे यांनी स्पष्ट सांगितले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची मुस्लीम धर्मगुरू, बौद्ध धर्मगुरू आणि दलित नेत्यांसोबत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मनोज जरांगे यांनी मोठी घोषणा केली आहे. तसेच मुस्लीम, दलित आणि मराठा समीकरणावर एकमत झाले असून, मराठा, दलित आणि मुस्लीम एकत्र आल्याचे मनोज जरांगे यांनी यावेळी म्हटले आहे. तसेच बंजारा समाज आणि ओबीसी समाजासोबत देखील चर्चा करणार असल्याचे यावेळी मनोज जरांगेंनी म्हटले आहे.

# आंघोळीसाठी गेलेले चार ऊसतोड मजूर सीना नदीत बुडाले

**प्रतिनिधी**
**■ सोलापूर**



सीना नदीवर आंघोळीसाठी गेलेले चौघे जण बुडाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही घटना माढा तालुक्यातील खैराव येथील सीना नदीपात्रात घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच तहसिल व पोलिस प्रशासन घटनास्थळावर दाखल झाले असून बुडालेल्या चौघांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. बुडालेले चौघे हे ऊसतोड कामगार हे यवतमाळ येथील असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, शंकर विनोद शिवणकर (वय २५), प्रकाश धाबेकर (वय २६), अजय महादेव मंगाम (वय २५), राजीव रामभाऊ गेडाम (वय २६) सर्व रा. लसणा टेकडी ता. जि. यवतमाळ अशी बुडालेल्यांची नावे आहेत. लोकमत शी बोलताना पोलिसांनी सांगितले की, जगदाळे वस्ती, खैराव (ता. माढा) येथे ऊसतोड करण्यासाठी ऊसतोड कामगारांची टोळी आली होती. सीना नदीवर चौघे जण आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी गेले होते. शंकर हा प्रथम पाण्यात गेल्यावर बुडायला लागल्यावर प्रकाश त्यास वाचवण्यासाठी गेला असता तोही बुडू लागल्याने इतर दोघेही पाण्यात उतरले. नदीतील पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने चौघेही पाण्यात बुडाले. घटनास्थळी पोलीस प्रशासन दाखल झाले असून दोन तासानंतरही चौघांचा शोध सुरुच होता.

# 10 अर्ज अवैध, सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार रिंगणात

**प्रतिनिधी**
**■ रत्नागिरी**

जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांसाठी दाखल झालेल्या ५५ उमेदवारी अर्जांमधील दहा अर्ज अवैध ठरले आहेत. प्रमुख राजकीय पक्षांमधील सर्व उमेदवारांसह एकूण ४५ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत.

दापोली आणि राजापूर मतदारसंघात प्रत्येकी १ तर गुहागर आणि चिपळूण मतदारसंघात प्रत्येकी ४ असे दहा उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत. सूचक कमी, प्रतिज्ञापत्र नाही, प्रतिज्ञापत्र प्रमाणित नाही, पक्षाचा एबी फॉर्म नाही, अशा कारणांमुळे हे अर्ज अवैध ठरले आहेत. मात्र, प्रत्येक मतदारसंघातील प्रमुख



पक्षांचे उमेदवार रिंगणातच आहेत. सद्यस्थितीत राजापूर, रत्नागिरी आणि गुहागरमध्ये प्रत्येकी ९, चिपळूणमध्ये ८ तर दापोलीमध्ये १० असे ४५ अर्ज वैध ठरले आहेत.

सावंतवाडीत १४, कुडाळमध्ये ११ आणि कणकवलीत ९ असे ३४ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी छाननीत सावंतवाडीत ५ आणि कुडाळमध्ये १ असे ६ अर्ज अवैध ठरले. त्यामुळे २८ अर्ज वैध ठरले आहेत. या २८ अर्जांमध्ये सावंतवाडी ९, कुडाळ ९ आणि कणकवलीतील १० अर्जांचा समावेश आहे.

## आम्ही फोडाफोडी नाही पण करेक्ट कार्यक्रम करणार- सतेज पाटील

**कोल्हापूर :** कोल्हापूर उत्तर मतदासंघाच्या आमदार जयश्री पाटील यांनी आज काँग्रेसचा रामराम करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीत कोल्हापूरात काँग्रेस आणि सतेज पाटी यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. जयश्री पाटील यांच्या शिवसेना प्रवेशावर सतेज पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचा हा निर्णय दुर्दैवी असल्याचे म्हणत काँग्रेसने निवडून दिले, पण एका रात्रीत निघून गेले, असा टोला त्यांनी जयश्री जाधव यांना लगावला आहे. आम्ही फोडाफोडी नाही, पण करेक्ट कार्यक्रम करणार, असा इशाराही पाटील यांनी शिंदे सेनेला दिला आहे. सतेज पाटील म्हणाले, सत्ता स्थापन करताना केलेली फोडफोडी कोल्हापुरात झाली आहे. कोल्हापुरातील काँग्रेसच्या माजी आमदार जयश्री जाधव यांना पक्षात घेतले. जे या पक्ष प्रवेशासाठी घेऊन गेलेत त्यांना जिंकण्याची खात्री नसल्याने हा प्रवेश करून घेतला. खासगी विमानाने त्यांना कोल्हापुरातून मुंबईला घेऊन गेले, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केली. जयश्री जाधव यांच्यावर दबाव होता की आणखी काय होते? हे त्याच सांगतील. मात्र, कोल्हापूरची जनता हे सहन करणार नाही, असे सतेज पाटील म्हणाले.

# धनंजय मुंडेंच्या शपथपत्रात पाच अपत्यांचा उल्लेख

## 2019 मध्ये तिघांचीच नोंद; पाच वर्षात संपत्तीही दुप्पट

**प्रतिनिधी**
**■ परळी**

राज्याचे कृषीमंत्री व परळीचे विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार) पुन्हा एकदा विधानसभेचं तिकीट दिलं आहे. गुरुवारी (२४ ऑक्टोबर) त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीने परळीमधून राजेसाहेब देशमुख (शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेवार) यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या शपथपत्रातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंडे यांनी उमेदवारी अर्ज भरताना सादर केलेल्या शपथपत्रात त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पाच अपत्यांचा उल्लेख केला आहे. २०१९ च्या निवडणुकीवेळी त्यांनी उमेदवारी अर्ज भरताना सादर कलेलेल्या शपथपत्रात तीन अपत्यांचा उल्लेख होता.

२०१९ च्या निवडणुकीवेळी मुंडे यांनी सादर केलेल्या शपथपत्रांत त्यांच्या दोन अपत्यांचा उल्लेख नव्हता. कारण तेव्हा ही दोन मुलं त्यांच्यावर अवलंबून नव्हती, असं त्यांच्या शपथपत्रातील माहितीवरून लक्षात येत आहे. शिवानी व सिशिव मुंडे अशी या दोन मुलांची नावं आहेत. दरम्यान. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची संपत्ती गेल्या पाच वर्षात दुपटीहून अधिक झाली आहे. निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या शपथपत्रातून त्यांनी ही माहिती जाहीर केली आहे. २०१९ मध्ये धनंजय मुंडे यांनी म्हटलं होतं की त्यांच्याकडे एकूण २३ कोटी रुपयांची संपत्ती आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी त्यांनी उमेदवारी अर्ज भरताना सादर

**धनंजय मुंडे यांच्या शपथपत्रात उल्लेख केलेल्या अपत्यांची नावे**
*वैष्णवी मुंडे*
*जान्हवी मुंडे*
*आदीश्री मुंडे*
*सिशिव मुंडे*
*शिवानी मुंडे*

केलेल्या शपथपत्रात नमूद केलं आहे की त्यांच्याकडे ५३.८० कोटी रुपयांची संपत्ती आहे. २००९ साली गोपीनाथ मुंडे लोकसभेवर गेल्यानंतर त्यांची लेक पकंजा मुंडे यांनी परळीचे नेतृत्व केले. दोन टर्म आमदार राहिल्यानंतर २०१९ साली धनंजय मुंडे यांनी या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसकडून विजय मिळवला. आता धनंजय मुंडे हे अजित पवारांबरोबर आहेत. पकंजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील राजकीय वितुष्टही संपले आहे.

# सत्तारांच्या अडचणी वाढल्या: निवडणूक शपथपत्रात 16 चुका

## मालमत्तांची माहितीही लपवली, उमेदवारी रद्द करण्याची मागणी

**प्रतिनिधी**
**■ संभाजीनगर**

सिल्लोड विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार अब्दुल सत्तार यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात गंभीर प्रकारच्या सोळा चुका असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. तसेच सत्तार यांच्या शपथपत्रात मानमत्तांची, वाहनांची, हिऱ्यांच्या दागिण्यांची खोटी माहिती दिल्याचा आरोप देखील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपल्ली आणि डॉ. अभिषेक हरिदास यांनी केली आहे.

या संदर्भात आपण निवडणूक आयोगाकडे तक्रार देखील दाखल



केली असल्याचे शंकरपल्ली यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सत्तार यांनी शपथपत्रात दाखवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि प्रत्यक्ष मालमत्ता यामध्ये प्रचंड तफावत आहे. अनेक मालमत्तांचे क्षेत्रफळ हे चुकीचे दाखवण्यात आले आहे. तसेच मालमत्तेवर करण्यात आलेल्या बांधकामाच्या गुंतवणुकीची माहिती देखील दाखवण्यात आली नसल्याचे या आरोपात म्हटले

## अडीच लाखांचा बनावट मद्यसाठा जप्त

**नंदुरबार :** । मध्यप्रदेश राज्यात तयार केलेल्या विना परवाना मद्यसाठा शहादा तालुक्यातील नागझिरी गावाजवळ असलेले उकलापाणी येथे म्हसावद पोलिसांनी जप्त केला आहे. साधारण २ लाख ४७ हजार रुपये किमतीचा हा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंदुरबारच्या जिल्हा पोलिस अधीक्षक श्रावण दत्त यांना मिळालेल्या माहितीनुसार म्हसावद पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारुळे यांनी नागझिरी गावाजवळ असलेले उकलापाणी येथे बिजला तेजला वळवी यांच्या घराजवळ रतिलाल आलम भिल हा दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मुद्देमाल लपवीत होता. माहितीनुसार पोलिसांनी धाड टाकली असता त्याठिकाणी २ लाख ४७ हजार २०० रुपये किमतीचा पॉवर कुल स्ट्रॉंग बियर असे लिहिलेले १०३ बॉक्स आढळून आले.

# भाजपने माझे घर फोडले, पत्नीला माझ्या विरोधात उभे केले

## हर्षवर्धन जाधव यांचा संताप, दानवेंवरही साधला निशाणा

**प्रतिनिधी**
**■ संभाजीनगर**

कन्नड विधानसभा मतदारसंघात हर्षवर्धन जाधव अपक्ष लढणार असून त्यांच्या विरोधात त्यांच्या पत्नी संजना जाधव निवडणूक लढणार आहेत. बायकोलाच आपल्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरवल्याने हर्षवर्धन जाधव यांनी संताप व्यक्त केला आहे.

हर्षवर्धन छत्रपती संभाजीनगर येथे बोलताना म्हणाले, आमच्या कुटुंबातील एका सदस्याला फोडून एका राजकीय पक्षाने तिकीट दिले. कुठेतरी या सगळया गोंधळाच्या





पाठीमागे रावसाहेब दानवे आहेत. माझे घर फोडले आणि आता माझ्या विरोधात साक्षात माझी पत्नी उभी करण्याचे काम झाले, याचा मी जाहीर निषेध व्यक्त करतो, अशी टीका हर्षवर्धन जाधव यांनी रावसाहेब दानवे व भाजप पक्षावर केली आहे. दिवाळी दोन दिवसांवरती आलेली आहे. सर्वजण आपल्या कुटुंबासमवेत दिवाळी साजरी करत आहेत. माझ्याकडे दिवाळी साजरी करण्यासाठी कोणच उरले नाही. मी आणि माझी आई दोघेच उरलेलो आहोत. ठोकून काढू शेवटी धर्मयुद्ध आहे, असा इशारा देखील हर्षवर्धन जाधव यांनी दिला आहे.

## कसारा घाटातून 2 कोटी तर नाशिक शहरात 31 लाखांची अवैध रोकड जप्त

**■ नाशिक**

नाशिक-मुंबई महामार्गावरील कसारा घाटाच्या पायथ्याशी पोलिसांनी नाकाबंदी केली असता वाहन तपासणीदरम्यान एका वाहनातून तब्बल 2 कोटींचे घबाड मिळाल्याने एकच खळबळ उडालीय. तसेच नाशिकमधील दोन कारवाईत पोलिसांनी 31 लाख 50 हजारांची अवैध रक्कम जप्त केलीय. कसारा घाटातील चिंतामण वाडी पोलीस चौकीजवळ स्थानिक पोलिसांनी वाहन तपासणीसाठी नाकाबंदी केली होती. यावेळी वाहनाची तपासणी केली असता, त्यात 2 कोटींची रक्कम आढळून आलीय. भरारी पथकाचे उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे, प्रभारी पोलीस अधिकारी सुनील बच्छाव आणि तपास सुरू आहे.

# दिल्ली ते पुणे विमानात बॉम्ब असल्याची अफवा

## पुणे विमानतळवर पुन्हा खळबळ

**प्रतिनिधी**
**■ पुणे**

मागील काही दिवसांपासून पुणे विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या तसेच पुणे विमानतळावर येणाऱ्या देश-विदेशातील विमानांमध्ये बॉम्ब असल्याचा मेसेज सोशल मीडियाच्या माध्यमातून येत आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम विमान वाहतुकीवर होत आहे. अशाच प्रकारे विस्तारा विमान कंपनीची दिल्ली ते पुणे फ्लाईट क्रमांक युके 991 यामध्ये बॉम्ब असल्याचा मेसेज ॲडम अलंजा ६४६ ट्विटर हँडल वरून अज्ञात व्यक्तीने दिला. त्यामुळे पुणे विमानतळावर पुन्हा खळबळ उडाली. याप्रकरणी तपास नंतर सदर अफवा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

याबाबत विमानतळ पोलिस ठाण्यात विजय गणपत नाणेकर



(वय -35 ,राहणार -टिंगरेनगर, पुणे) यांनी अज्ञात ट्विटर हँडल विरोधात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात व्यक्तीने ॲडमअलंजा ६४६ ट्विटर हँडल वरून मेसेज केला की ,आय प्लेस्ड पाईप बॉम्बस ऑन बोर्ड ऑफ द फॉलोइंग फ्लाइट्स युके 17,अशा प्रकारची धमकी असलेला मजकूर ट्विट करून विस्तार कंपनीचे विमान दिल्ली ते पुणे या फ्लाईट मधील प्रवासी तसेच एअरपोर्ट परिसरातील नागरिक व प्रवाशांमध्ये खोटी माहिती व अफवा पसरून भीतीदायक वातावरण निर्माण केले.

# बापूसाहेब महाराजांनी पेरली लोकशाहीची बीजे - देसाई

## इतिहासाकडून योग्य दखल नाही...

**प्रतिनिधी**
**■ सावंतवाडी**

पुण्यश्लोक श्रीमंत बापूसाहेब महाराज यांनी तत्कालीन सावंतवाडी संस्थानात लोकशाही राजवटीची बीजे पेरली. ते केवळ राजा नव्हते तर त्यांच्यात लोकाभिमुख कारभार करणारे एक अख्खे राज्य सामावले होते. मात्र इतिहासाने त्यांच्या या महान कार्याची योग्य दखल घेतली नाही, अशी खंत ज्येष्ठ पत्रकार शिवप्रसाद देसाई यांनी सोमवारी येथे आयोजित व्याख्यानात व्यक्त केली. सावंतवाडी संस्थानचे राजे पुण्यश्लोक बापूसाहेब महाराज यांच्या पुर्ण क्षमतेने राज्याची सुत्रे हाती घेत झालेल्या राज्याभिषेकाचा शताब्दी महोत्सव उद्यापासून (ता. २९) सुरु होत आहे.

यानिमित्त सावंतवाडी संस्थान मराठा समाज, मुंबई या संस्थेची सावंतवाडी व कुडाळ समितीच्यावतीने राणी पार्वतीदेवी हायस्कूलच्या सहकार्याने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी सावंतवाडी समितीप्रमुख व्ही. बी. नाईक, मुख्याध्यापक जगदीश धोंड, सामाजिक कार्यकर्ते ॲड. नकुल पार्सेकर, गजानन परब, पंढरी राऊळ, भरत गावडे, सतीश बागवे, सु.



वि. गवस, सी. एल. नाईक आदी उपस्थित होते. श्री. देसाई यांनी बापूसाहेब महाराजांच्या राज्य कारभाराचे अनेक पैलु यावेळी मांडले. ते पुढे म्हणाले, ''छोटे संस्थान, मर्यादित महसूल, ब्रिटिशांची करडी नजर अशा सगळ्या प्रतिकूल गोष्टी असूनही जनतेच्या भल्यासाठी कोणतीही कसर राहू नये यासाठी बापूसाहेब महाराज यांनी आपले अख्खे आयुष्य अर्पण केले. स्वत: फिरून जनतेमध्ये मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर त्यांचा भर असे. स्वतंत्र कृषी खाते निर्माण करून शेतीसाठी पुरविलेल्या सुविधा, आरोग्य, स्त्रीशिक्षण, व्यसनमुक्ती यासाठी केलेले काम अद्वितीय आहे. ते तेजस्वी आणि प्रत्येकाला भुरळ घालणारे व्यक्तिमत्व होते. राजकारणापेक्षा समाजकारण करण्यावर नेहमी भर देणारे, राजेशाहीपेक्षा लोकशाही मूल्यांचा सातत्याने पाठपुरावा करणारे,विवेक, संयम, सुसंस्कृतता या मूल्यांवर विश्वास असणारे ते राजे होते. त्यांनी लहानपणापासूनच शेवटच्या क्षणापर्यंत लोकांसाठी केलेला संघर्ष हा प्रेरणादायी आहे.'' ते म्हणाले, ''तत्कालीन स्थितीत असलेल्या लोकाभिमुख कारभार असलेल्या राजांच्या यादीत त्यांचे नाव खरे तर वरच्या क्रमांकाला आहे. मात्र इतिहासाने त्याची योग्य दखल घेतली नाही. त्यांनी आपल्या अवघ्या तेरा वर्षांच्या कार्यकाळात लोकशाहीची बीजे येथे पेरली. त्याची फळे आजही आपण चाखत आहोत.'' प्रास्ताविक भरत गावडे तर सूत्रसंचालन मेघना राऊळ यांनी केले.

## कर्ज देत नसल्याचा राग; बँकेत मॅनेजरवर कोयत्याने वार

**सातारा :** व्यवसाय सुरु करण्यासाठी बँकेत कर्ज प्रकरण टाकले होते. मात्र बँकेकडून कर्ज मिळत नसल्याने संतापाच्या भरात थेट बँकेत जाऊन बँक मॅनेजरवर कोयत्याने वार केले. हा धक्कादायक प्रकार सातारा जिल्ह्यातील कराडमधील इंडियन ओवरसीज बँकेत घडला आहे. सातारा जिल्ह्यातील इंडियन ओवरसीस बँकेच्या कराड शाखेचे बँक मॅनेजर आशिष कश्यप यांच्यावर रेठरे बुद्रुक येथील आशुतोष दिलीप सातपुते याने कोयत्याने वार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आशुतोष सातपुते यांनी शेळी पालनासाठी बँकेकडे अर्ज केला होता. मात्र व्यवसायासाठी कश्यप कर्ज देत नाही. याचा राग मनात धरून जिवंत ठेवणार नाही; असे म्हणत आशुतोष याने बँक मॅनेजर कश्यप यांच्यावर सशस्त्र हल्ला केला. यात बँक मॅनेजर कश्यप हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला व हाताला दुखापत झाली आहे. दरम्यान घटनेनंतर जखमी बँक मॅनेजर कश्यप यांच्यावर कराडमधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून याप्रकरणी कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# तृतीयपंथीयाचे निवडणूकीच्या रिंगणात पहिलं 'पाऊल'; रावेरमध्ये 'वंचित'कडून उमेदवारी

**प्रतिनिधी**
**■ जळगाव**

तृतीयपंथी हक्क अधिकार समितीच्या माध्यमातून चर्चेत असलेल्या फैजपूर (ता. यावल) येथील शमिभा भानुदास पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पाऊल टाकले आहे. वंचित बहुजन आघाडीने त्यांना उमेदवारी दिली असून तृतीयपंथी म्हणून विधानसभेसाठी राज्यातून पहिल्याच आणि एकमेव अशा त्या उमेदवार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवार प्रचारात लागले आहेत. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील रावेर विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने शमिभा यांना उमेदवारी दिल्याने त्यांनी देखील आपल्या प्रचाराला सुरवात केली आहे. ३९ वर्षीय शमिभा या एम.ए. (मराठी) शिक्षित असून कवी ग्रेस यांच्या साहित्यावर त्या पीएच.डी. करीत आहेत. २८ हजार ३८० रुपयांची



ठेव आणि ९५ हजारांची रोकड हाती असणाऱ्या शमिभा यांचा अर्जही वैध ठरला आहे. यामुळे त्या आजपासून प्रचारात व्यस्त झाल्या आहेत.

शमिभा यांचे पूर्वीचे नाव शाम मीना भानुदास पाटील असे होते. त्यांनी नंतर शमिभा असे नाव केले. ३० व्या वर्षी तृतीयपंथी असल्याचे त्यांनी जाहीर केले आणि तृतीयपंथी घटकासाठी समोर आल्या. दरम्यान भादली (ता. जळगाव) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अंजली पाटील या तृतीयपंथीने सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज भरला. महिला संवर्गातून भरलेला अर्ज तत्कालिन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरविला. त्याविरोधात शमिभा यांनी एल्गार उठवत थेट उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. उच्च न्यायालयाने अंजली पाटील यांचा अर्ज वैध ठरविल्याने तृतीयपंथी घटकाने अर्धा लढा जिंकला. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत अंजली पाटील विजयी झाल्या. त्यानंतर शमिभा पाटील या चर्चेत आल्या. आता स्वतः शमिभा या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत.

## स्टोक्सच्या घरी मौल्यवान वस्तू आणि पदकांची चोरी

**लंडन :** इंग्लंड क्रिकेट संघाचा कर्णधार बेन स्टोक्स याच्या घरात चोरी झाली आहे. चोरट्यांनी त्यांच्या घरातून मौल्यवान वस्तू, दागिने आणि पदके पळवून नेली आहेत.खुद्द बेन स्टोक्सने बुधवारी रात्री एक्स पोस्टद्वारे ही माहिती दिली. स्टोक्सने अपीलसह चोरीच्या वस्तूंचे फोटो प्रसिद्ध केले. स्टोक्सने लिहिले की, जेव्हा तो इंग्लंड संघासोबत पाकिस्तान दौऱ्यावर होता, तेव्हा १७ ऑक्टोबरला त्यांच्या घरी चोरी झाली होती.माझी पत्नी आणि दोन लहान मुले घरी असताना ही चोरी झाल्याचे स्टोक्सने सांगितले. माझ्या कुटुंबातील कोणालाही शारीरिक इजा झाली नाही हे बरे झाले.स्टोक्सने लिहिले की या अनुभवामुळे त्याच्या भावनिक आणि मानसिक स्थितीवर परिणाम झाला आहे. परिस्थिती किती बिघडली असती याचा विचार करत आहोत. मी चोरीला गेलेल्या काही वस्तूंची छायाचित्रे प्रसिद्ध करत आहे. जे सहज ओळखता येईल अशी मला आशा आहे.



सुवर्णमहोत्सवी कुमार व मुली (ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा

# धाराशिवचा दुहेरी मुकुटासह दिवाळी धमाका

## कुमारगटात पहिले तर मुलींच्या गटात चौकारासह आठवे विजेतपद

प्रतिनिधी
■ धाराशिव

यजमान धाराशिवने सुवर्ण महोत्सवी (५०वी) कुमार व मुली (ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत कुमार व मुली या दोन्ही गटातून विजेतपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूसाठी असलेले सावित्री पुरस्कार तन्वी भोसले हिने व विवेकानंद पुरस्कार सोत्या वळवी या धाराशिवच्याच खेळाडूंनी पटकाविले. मुलींच्या गटात सोलापूर, ठाणे तर मुलांच्या गटात सोलापूर व पुण्याने अनुक्रमे तृतीय व चतुर्थ स्थान संपादिले. धाराशिवने कुमारगटात पहिलेच विजेतपद पटकावले असून मुलींच्या गटात विजेतपदाच्या चौकारासह (२०२१-२२ पासून सलग चौथे विजेतपद) तर एकूण आठवे विजेतपद मिळवत सुवर्णमहोत्सवी वर्षात दुहेरी विजेतपदासह दिवाळी धमाका साजरा केला. यापूर्वी २०१५-१६ साली जळगाव येथे झालेल्या ४३ व्या स्पर्धेत ठाण्याने दुहेरी मुकुट मिळवला होता त्यानंतर तब्बल सहा अजिंक्यपद स्पर्धांनंतर धाराशिवला हा इतिहास घडवता आला. यजमान म्हणून सुध्दा दुहेरी मुकुट मिळवणारा धाराशिव हा पहिला संघ ठरला व प्रेक्षकांनी दिवाळीत विजयोत्सव साजरा करताना आकाश आतीशबाजीच्या विविध रंगांनी भरून टाकले.





**सर्वोत्कृष्ट खेळाडू**
*अष्टपैलू: सोत्या वळवी, तन्वी भोसले (धाराशिव).*
*संरक्षक : विलास वळवी (धाराशीव), सानिका चाफे (सांगली).*
*आक्रमक : अश्विनी शिंदे (धाराशिव),प्रज्वल बनसोडे (सांगली).*

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त गर्दीत झालेल्या मुलींच्या अंतिम सामन्यात धाराशिवने सांगलीचा ११-९ असा २ गुणांनी पराभव केला. मध्यंतराची ६-४ ही २ गुणांची आघाडीच त्यांना विजय मिळवून देऊन गेली. धाराशिवकडून अश्विनी शिंदेने ४.०० व २.१० मिनिटे संरक्षण करताना आक्रमणात ६ गुण मिळवत प्रेक्षकांना दिवाळीत फटके फोडण्याचा आनंद द्विगुणीत करून दिला. तन्वी भोसलेने १.२० आणि २.१० मिनिटे संरक्षण केले. सृष्टी सुतारने १.१० आणि १.०० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गुण वासूल केला. प्रांजली काळेने पहिल्या डावात नाबाद १.२० व दुसऱ्या डावात १.३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गुण संघाला मिळवून दिला. मैथिली पवारने १.१० व १.४० मिनिटे संरक्षण केले. सुहानी धोत्रेने आक्रमणात ३ खेळाडू बाद करताना विजेतपदाचा धमाका उडवून दिला. तर पराभूत सांगली कडून सानिका चाफेने अष्टपैलू कामगिरी करताना ३.१० व १.४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ३ गुण मिळवत "हम भी किसीसे कम नही" या अविर्भावात कामगिरी नोंदवली. सानिया सुतारने १.४० व १.३० मिनिटे संरक्षण केले. प्रतीक्षा बिराजदारने आक्रमणात ३ खेळाडू बाद करून संरक्षणामध्ये १.१० व २.४० मिनिटे अशी वेळ नोंदवताना कडवी लढत दिली. पण शेवटी धाराशिवने विजेतपदाचा विजयी चौकार मारलाच.

मुलांच्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात जादा डावांमध्ये धाराशिवने सांगलीवर २३-२२ असा २.३० मिनिटे राखून १ गुणाने विजय साजरा करताना पहिले वाहिले विजेतपद खेचून आणले. शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या या सामन्यात मध्यंतराला १०-७ अशी तीन गुणांची आघाडी धाराशिवकडे होती. त्यानंतर मात्र, सांगली संघाने दुसऱ्या डावात जोरदार मुसंडी मारत आक्रमण केले व धाराशिवला १६-१६ असे बरोबरीत रोखले. जादा डावात मात्र धाराशिवने २.३० मिनिटे राखून ७-६ अशी बाजी मारली.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले, सोलापूरचे पोलिस उपअधिक्षक दूलबा ढाकणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नेत्र रोग तज्ञ डॉ. वृषाली लामतुरे (वारद), डॉ. मिलिंद पोळ, डायट कॉलेजचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, अर्जुन पुरस्कार प्राप्त सौ सारिका काळे, मराठी चित्रपटसृष्टीचे सह दिग्दर्शक संतोष साखरे,

शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संघटक जनार्दन शेळके, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा आदी उपस्थित होते. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले.

# आयसीसी टेस्ट रँकिंगमध्ये रबाडा अव्वलस्थानी

## फलंदाजांच्या क्रमवारीत कोहली-पंत टॉप-10 मधून बाहेर

वृत्तसंस्था
■ लंडन

दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आयसीसीच्या नव्या कसोटी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याने जसप्रीत बुमराहला 860 रेटिंगसह मागे टाकले आहे. बुमराह 846 रेटिंगसह दोन स्थानांनी घसरून तिसऱ्या स्थानावर आला आहे.

बुमराह व्यतिरिक्त टॉप-10 मध्ये असलेल्या भारताच्या रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा यांनाही प्रत्येकी 2 स्थानांचे नुकसान झाले आहे. अश्विन चौथ्या स्थानावर तर जडेजा आठव्या स्थानावर घसरला आहे.

पाकिस्तानचा डावखुरा फिरकी गोलंदाज नोमान अलीने ताज्या क्रमवारीत आठ स्थानांनी झेप घेतली आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील शेवटच्या सामन्यात त्याने 9 विकेट घेतल्या होत्या. ज्याचा त्याला रँकिंगमध्ये फायदा झाला आहे. आता टॉप-10 मध्ये समाविष्ट झालेला तो एकमेव पाकिस्तानी गोलंदाज आहे. बांगलादेशविरुद्ध कागिसो रबाडाने शानदार गोलंदाजी केली. त्याला 3 स्थानांचा फायदा झाला आहे.

इंग्लंडच्या हॅरी ब्रूकला एक स्थान गमवावे लागले आहे. तो आता 778 रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. उस्मान ख्वाजानेही न खेळता एक स्थान मिळवले आहे. तो आता सातव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. पाकिस्तानच्या सौद शकीलला 20 स्थानांचा फायदा झाला आहे. त्याचे रेटिंग 724 झाले आहे. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रनेही आठ स्थानांची प्रगती केली असून तो आता 711 च्या रेटिंगसह 10 व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतची 5 स्थानांनी घसरण झाली आहे. आता तो टॉप 10 मधून बाहेर पडून थेट 11 व्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याच्यासाठी हा मोठा धक्का आहे. विराट कोहलीनेही एका झटक्यात 6 स्थान गमावले आहेत. तो आता 688 च्या रेटिंगसह 14 व्या क्रमांकावर गेला आहे. तसेच त्याला टॉप 10 मधून बाहेर पडावे लागले.



***यशस्वी जैस्वाल फलंदाजी क्रमवारीत टॉप-10 मध्ये आहे***
*आता टीम इंडियाचा फक्त एकच खेळाडू टॉप 10 मध्ये उरला आहे. न्यूझीलंडविरुद्ध खराब कामगिरीमुळे विराट कोहली आणि ऋषभ पंतला बाहेर जावे लागले आहे. ऋषभ पंत 11व्या तर विराट कोहली 14व्या स्थानावर पोहोचला आहे.*

***कसोटी क्रमवारीत जो रूट नंबर वन फलंदाज***
*फलंदाजांच्या क्रमवारीत इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट पहिल्या क्रमांकावर आहे. त्याचे रेटिंग 903 झाले आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन 813 रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे. भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आता एका स्थानाच्या झेप घेत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग आता 790 आहे.*

## विराट कोहलीला 21 कोटी तर ऋषभ पंतचे नाव गायब!

### आयपीएल रिटेन्शन लिस्टने धक्का

**मुंबई :** इंडियन प्रीमियर लीग (IPL) २०२५ च्या हंगामापूर्वी एक मेगा लिलाव होणार आहे. हा लिलाव या वर्षी नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या सुरुवातीला होऊ शकतो. पण त्याआधी, सर्व १० फ्रँचायझींना त्यांच्या रिटेन केलेल्या आणि सोडलेल्या खेळाडूंची यादी तयार करुन बीसीसीआयला सादर करायची होती. त्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर होती. यानंतर आज सर्व संघांनी आपल्या रिटेन खेळाडूंची यादी जाहीर केली आहे.मात्र या रिटेन्शन यादीत दिल्ली संघाने यष्टीरक्षक -फलंदाज ऋषभ पंत आणि टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी यांना चेन्नई संघाने रिटेन केलेले नाही हि बाब क्रिकेटशौकिनांना धक्का देणारी आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल २०२५ साठी केवळ तीन खेळाडूंना कायम ठेवले आहे. यामध्ये विराट कोहली, यश दयाल यांच्या नावाचा समावेश आहे.

## घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघटनेची दीपावली पहाट साजरी



प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघ/ सेनेच्या वतीने गुरुवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता कै.वामनराव कोटावदे चौक (तात्या) हिंन्दूसभा हॉस्पिटल जवळ धुम धडाक्यात मिटाई वाटप करुन दिवाळी पहाट साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी घाटकोपर चे विक्रेते मोट्या संखेने उपस्थित होते. संघटनेचे पदाधिकारी प्रकाश वाणी, दिपक गवळी, रवि संसारे, प्रकाश गिलबिले, अंकुश खरात, सचिन बांगे, युनूस पटेल, गणेश भोर, नितिन रेनूसे, अंकूष पावसकर, धनंजय शेलार, अरविंद नंदी, विपुल गायकवाड, वैभव सर्वांकर, सुभाष कटनवरे, विजय कोठावदे, किशोर येवले, ब्रह्मानंद पांगे, जगन वाघ, विलास कोठावदे आदिसह अन्य सदस्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# अदानी इलेक्ट्रिसिटी आणि अदानी फाउंडेशन या दिवाळीत आनंद-चांगुलपणा पसरवणार

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळी हा तेजाचा सण असून आनंद आणि उत्साहाने तो साजरा केला जातो. मात्र या सणादरम्यान दाट लोकवस्ती असलेल्या भागात काही धोके देखील उद्भवू शकतात. त्यामुळे सर्वांना सुरक्षित आणि चांगली दिवाळी साजरी करता यावी यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने आनंद आणि सुरक्षितता, जागरूकता पसरवण्यासाठी आणि समाजाच्या सहभागासाठी #अच्छाईहरदिन ही मोहीम हाती घेतली आहे.

तसेच उत्थान मोहिमेअंतर्गत अदानी इलेक्ट्रिसिटी आणि अदानी फाऊंडेशन यांनी दिवाळी दरम्यान अग्नी आणि वीज सुरक्षितता यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून दिले आहे. तसेच या विद्यार्थ्यांसाठी कंदील बनवण्याची कार्यशाळाही आयोजित करण्यात आली.अदानी इलेक्ट्रिसिटीने वीज वितरण क्षेत्रातील ६४ महापालिका शाळांमधील वीस हजार विद्यार्थ्यांना दीड लाख दिवे, पणत्या वाटल्या. हे विद्यार्थी त्यातील जादा दिवे आपल्या शेजाऱ्यांना देतील आणि त्याद्वारे अग्नी आणि वीज सुरक्षितता यांचा संदेश आपल्या वसाहतीत पसरवतील.

### कंदील बनवण्याची कार्यशाळा आयोजित होणार




दिवाळीतील या मोहिमेबद्दल अदानी इलेक्ट्रिसिटी चे प्रवक्ते म्हणाले की, चांगुलपणा पसरवूया - #अच्छाईहरदिन या मोहिमेद्वारे आम्ही मुंबईकरांची दिवाळी सुरक्षित, आनंदी आणि अर्थपूर्ण व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहोत. यात सुरक्षाविषयक जागरूकता मोहिमेद्वारे तसेच समाज सहभाग आणि नवनिर्मिती याद्वारे ही मोहीम, अदानीच्या उत्थान या कार्यक्रमातील जनहित व सक्षमीकरण साधणे, ही मूलतत्त्वेच प्रतिबिंबित करते आहे. याद्वारे भारतातील या सर्वात मोठ्या प्रमाणावर साजऱ्या केल्या जाणाऱ्या या सणादरम्यान जनहित साधले जाईल, तसेच सक्षमीकरणही केले जाईल. उत्थान मोहिमेअंतर्गत अदानी इलेक्ट्रिसिटी आणि अदानी फाउंडेशन यांनी एकत्रितपणे ८२ महापालिका शाळांमधील २४ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या क्षमतावाढीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

# कोळी महिलांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत बेलासिस ब्रीज बांधू देणार नाही!

प्रतिनिधी
■ मुंबई

ताडदेव येथील 'बेलासिस ब्रिज' येथे सन १९७० पूर्वी पासून मासळी विक्री व्यवसायात कार्यरत असलेल्या ३६ मासळी विक्रेत्या कोळी महिलांना महानगरपालिकेच्या 'डी' वार्ड मधील अधिकाऱ्यांच्या दूजाभावामुळे यंदाची आणि ह्या पुढील सर्व दिवाळी काळी साजरी करण्याची नामुष्की ओढावी लागणार आहे. सरकारच्या लाडकी बहीण मोहिमेचाच भाग म्हणून की काय 'डी' वार्ड मधील अधिकाऱ्यांकडून भूमिपुत्र कोळी महिलांना सावत्र बहिणीची वागणूक देत असल्यामुळे मच्छिमार समाजामध्ये सर्वत्र असंतोषाची लाट पसरली आहे.

पाच दशकांपासून आपली उपजीविका भागविणाऱ्या महिलांना जो पर्यंत योग्य पुनर्वसन होत नाही तो पर्यंत बेलासिस ब्रीज च्या बांधकामाला एक वीट सुद्धा चढू देणार नसल्याची आक्रमक भूमिका अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने घेतली आहे.

### मच्छिमार संघटनेने घेतला पवित्रा



ताडदेव येथील 'बेलासिस ब्रिज' येथे सन १९७० सालापासून परंपरागत रित्या ३६ मासळी विक्री दुकाने (ओटा) कार्यरत आहेत. सदर मासळी दुकानांमध्ये भूमिपुत्र मासळी विक्रेत्या कोळी महिला आपला उदरनिर्वाह करीत आले आहेत. ह्या सर्व कोळी महिलांना महापालिकेअंतर्गत परवानाधारक म्हणून नोंद आहे परंतु दुर्दैवाने महापालिकेतील निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे काल कोळी बघिणींवर उपासमाळीची वेळ येऊन उभी राहिली आहे.

पाच दशकांपासून व्यवसाय करणाऱ्या एकूण ३६ मासे विक्रेत्या कोळी महिलांपैकी फक्त ५ महिलांना वर्तमान परवाने देण्यात आले आहेत आणि इतर ३१ महिलांच्या परवान्याचे नूतनीकरणडी वार्ड मधील अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक टाळण्यात आले आहे तसेच मुंबई सेंट्रल येथील पश्चिम रेल्वेच्या मालकीचे शेकडो वर्षापूर्वीचे बेलाईस ब्रिजच्या बांधमकाम करण्याचे नियोजन झाल्यामुळे ब्रिजला लगत असलेल्या इतर दुकानदारांना पालिकेकडून नोटीस देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे परंतु येथील कोळी मासळी विक्री महिलांना पालिकेकडून पुनर्वसन संदर्भात लेखी स्वरुपात काहीच दिले नसल्यामुळे कोळी महिलांचे भविष्य अंधारात असल्याचे समितीचे मुंबई शहर अध्यक्ष प्रफुल्ल भोईर यांनी सांगितले.

मासळी दुकानांच्या मागील बाजूस 'द ग्रेट रॉयल बिल्डिंगने' पालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत रित्या गार्डन ची उभारणी केली आहे परंतु त्याला पालिकेने कसलीच नोटीस बजावली नसल्याने पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून भूमिपुत्रांवरील दुजाभाव प्रखरपणे दिसू येत असल्याचे भोईर यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

DPCR-२०३४ च्या कलम ७.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जे दुकाने रेल्वे जमिनी अथवा शासकीय जमिनीवर कार्यरत आहेत आणि सार्वजनिक व निम-सार्वजनिक प्रकल्पांसाठी ह्या जमिनीवरून ह्या दुकानांचे स्थलांतर अपेक्षित आहेत अश्या कार्यरत दुकानदारांना व भाडेकरूंचे स्थलांतर नियोजन क्षेत्रातील इतर योग्य ठिकाणी करणे बंधनकारक असून बेलासिस ब्रिजला लागून मासळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी महिलांचे पुनर्वसन मनपाच्या मालकीच्या जागेतच करण्याची मागणी मच्छिमार समितीकडून निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याचे समितीकडून सांगण्यात आले आहे तसेच 'द ग्रेट रॉयल' बिल्डिंगने मनपाच्या मालकीच्या जागेवर उभे केलेले गार्डन ताब्यात घेऊन मासळी विक्रेत्या महिलांना येथेच पुनर्वसन करण्याची मागणी सुद्धा समितीकडून करण्यात आली आहे.

बेलासीस ब्रीज लगत कार्यरत असलेल्या सर्व दुकानदारांना भारतीय संविधानातील परिशिष्ट २१ अंतर्गत आपली उपजिवीका करण्याचा अधिकार असताना पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कोळी महिलांवर होणारी कार्यवाही संविधानाचा विटंबना असून ह्या विषयाशी निगडित संबंधित अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशी करण्याचा मागणी मनपा आयुक्त भूषण गगराणी ह्यांना करण्यात आली असल्याचे समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी सांगितले.

# रिपब्लिकन एकता आघाडीची समन्वय समिती स्थापन

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीत भाजपची भिस्त मित्र पक्षांपेक्षाही मत विभागणीवरच अधिक आहे, असे नमूद करत लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला साथ दिलेल्या काही छोट्या - मोठ्या आंबेडकरवादी संघटना आणि गटांनी यावेळीही महाविकास आघाडीसोबत कायम राहण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाचे दलित संघटनांसोबत झालेल्या एका संयुक्त बैठकीत महविकास आघाडीतर्फे ज्येष्ठ शिवसेना नेते सुभाष देसाई, खासदार संजय राऊत, खासदार अनिल देसाई यांनी एका बैठकीत स्वागत केले आहे.

त्या पार्श्वभूमीवर, ' रिपब्लिकन एकता आघाडी ' च्या मुंबईत नुकत्याच झालेल्या एका बैठकीत प्रचारमध्ये ' मविआ ' तील तीनही पक्षांशी संवाद, संपर्क राखण्यासाठी एक समन्वय समितीही स्थापन करण्यात आली आहे. ही बैठक आझाद मैदान येथील रिपब्लिकन पक्ष ( खोरिप) कार्यालयात पार पडली.

रिपब्लिकन एकता आघाडीच्या या समन्वय समितीमध्ये सुरेश केदारे ( दलित पँथर), मिलिंद सुर्वे ( पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र), भाऊ निरभवणे (रिपब्लिकन पक्ष - खोब्रागडे), सागर संसारे ( स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष) रवी गरुड (दलित सेना ), मनोज बागुल ( रिपब्लिकन जनशक्ती), प्रकाश हिवाळे ( लोक मोर्चा), सतीश डोंगरे ( आंबेडकरवादी भारत मिशन), बंधुराज लोणे (पत्रकार) यांचा समावेश आहे.

या समन्वय समितीमधील सदस्यांसहित या रिपब्लिकन एकता आघाडीच्या बैठकीला प्रख्यात साहित्यिक अर्जुन डांगळे, कॉ. सुबोध मोरे, मिलिंद पखाले ( नागपूर ), ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, भगवान गरुड (स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष), भागवत कांबळे ( रिपब्लिकन पक्ष - खोब्रागडे ), मंगेश पगारे ( पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र), शिवाजी गायकवाड, अनिल लगाडे, शशिकांत हिरे, रामानंद पाला हे घटक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

***सत्तांतराला सर्वोच्च प्राधान्य***
*या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेत सत्ता बदलाचे वारे जोरात वाहत असून बौद्ध, दलित, आदिवासी हे समाजही त्याला अपवाद नाहीत. किंबहुना परिवर्तनाची सर्वाधिक गरज त्यांना आहे. त्यातच भाजपने ही निवडणूक केवळ सत्ता टिकवण्यासाठी नव्हे, तर राज्यसभेत बहुमत प्राप्त करण्यासाठी अधिक महत्वाची मानली आहे. कारण त्या बहुमता नंतरच भाजपला जाचक वाटत असलेले धर्मनिरपेक्ष राष्ट्र आणि संविधान याबाबत निर्णायक पावले उचलणे शक्य होणार आहे. त्यामुळे बौद्ध समाजाने, आंबेडकरी चळवळीने यावेळी सत्तांतर घडवण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे काळाची गरज ठरली आहे, असे रिपब्लिकन एकता आघाडीने आपल्या पत्रकात म्हटले आहे.*

स्वतंत्र आंबेडकरवादी राजकारणाची उभारणी ही केवळ निवडणूक काळातच करण्याची गोष्ट मुळीच नाही. ती गंभीरपणे करण्याची दीर्घ पल्ल्याची प्रक्रिया आहे, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

तसेच निवडून येण्याची सर्वांगीण क्षमता आणि स्वत:साठी मतदासंघांची बांधणी या गोष्टींच्या अभावामुळे आंबेडकरवादी पक्षांच्या उमेदवारांच्या विजयाची शक्यता दुरावली आहे. त्यातच 'स्वबळावर लढत' आणि 'स्वतंत्र आघाड्यांची निर्मिती ' हे दोन्ही पर्याय आंबेडकरवादी राजकारणासाठी आजवर नेहमीच निरुपयोगी ठरले आहेत, याकडे रिपब्लिकन एकता आघाडीने लक्ष वेधले आहे.

# बोरीवलीत अपक्ष उमेदवारीवर गोपाळ शेट्टी ठाम

## उमेदवारी न मिळाल्यामुळे रवी राजा यांनी केला भाजपात प्रवेश

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी बोरीवलीत भाजपने बाहेरचा उमेदवार लादल्यामुळे स्थानिकांनी आंदोलन केले व माजी खासदार गोपाळ शेट्टी यांना उभे केले आहे. गोपाळ शेट्टी यांनी अपक्ष उमेदवार म्हणून लढत देण्याचे ठरविले आहे. साडेतीन लाख बोरिवलीकरांचा हा आवाज असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा प्रश्नच नाही.मी लढणार, असे गोपाळ शेट्टी यांनी सांगितले तर दुसऱ्या ठिकाणी काँग्रेसचे जेष्ठ नेते व पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते रवी राजा यांना सायन कोळीवाडा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस ने उमेदवारी न दिल्याने ते नाराज होऊन त्यांनी काल देवेंद्र फडणवीस व मुंबई भाजप चे अध्यक्ष अँड आशिष शेलार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.




गोपाळ शेट्टी यांनी सांगितले की, मी बोरिवली च्या अस्मितेसाठी व स्वाभिमानासाठी लढत आहे.मी माझ्या पक्षाच्या विरोधात निवडणूक लढवत नाही.मी अजून ही भाजपचाच कार्यकर्ता आहे.मला पक्षाने मोठे केले आहे. ७ वेळा मला उमेदवारी दिली होती व मी त्या सर्व निवडणूका जिंकलो आहे. पार्टीच्या अस्तित्वाला मोठे करण्यासाठी मी लढाई लढतो आहे. त्यामुळे अर्ज मागे घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अशी गोपाळ शेट्टी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बोरीवलीत चांगलीच लढत बघायला मिळणार आहे.

दरम्यान, मुंबादेवी येथे भाजपने माजी नगरसेवक अतुल शहा यांना उमेदवारी न देता शयना एन सी यांना उमेदवारी दिल्याने अतुल शहा यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. तशीच परिस्थिती अंधेरी पश्चिम मतदारसंघात काँग्रेस बाबत घडली आहे. तिथे ३ वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले मोहसिन हैदर यांना उमेदवारी न मिळाल्याने हैदर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला आहे. वर्सोवा मतदार संघात शिवसेना उबाठा मध्ये बंडखोरी झाली आहे. पक्षाने शाखा प्रमुख हरून खान याना उमेदवारी दिलेली असताना माजी नगरसेवक राजू पेडणेकर यांनी अपक्ष अर्ज भरला आहे.

कुर्ला मतदारसंघात शिवसेना उबाठा ने प्रवीणा मोरजकर या महाविकास आघाडीकडून उभ्या राहिल्या असताना तिथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मिलिंद कांबळे यांनी ही उमेदवारी दाखल केली आहे. विशेष म्हणजे तिथे २ मिलिंद कांबळे उभे आहेत एक अपक्ष आहेत. चांदिवली मतदारसंघातही दोन दिलीप लांडे उभे आहेत.एक अपक्ष असलेले दिलीप लांडे हे बीड येथील रहिवासी आहेत. भांडुप व विलेपार्ले येथे दोन्ही पती पत्नी यांनी अर्ज भरले आहेत. भांडुप मध्ये माजी आमदार अशोक पाटील यांनी शिंदे गटाकडून तर पत्नी अपक्ष अर्ज भरला आहे . विले पार्ले येथेंप्रग अळवणी हे भाजप कडून तर पत्नी अपक्ष उभ्या अर्ज भरला आहे.

## ट्रम्प यांची 'गारबेज' सफारी...

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या निवडणुकीत बायडेन यांनी ट्रम्प समर्थकांना 'कचरा' म्हटल्यानंतर राजकारण तीव्र झाले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प बुधवारी संध्याकाळी विस्कॉन्सिनमध्ये प्रचारासाठी गेले होते. येथे ते लाल टोपी आणि सफाई कामगाराचे जॅकेट घालून कचऱ्याच्या ट्रकमध्ये बसलेले दिसले. ट्रम्प यांनी ट्रकमध्ये बसून पत्रकारांच्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. ट्रम्प म्हणाले- कमला आणि जो बायडेन यांच्या वक्तव्याचा त्यांचा विरोध आहे. कमला आमच्या समर्थकांबद्दल काय विचार करतात ते बायडेन यांनी तंतोतंत सांगितले आहे, परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की अमेरिकेतील 250 दशलक्ष लोक कचरापेटी नाहीत. खरेतर, 29 ऑक्टोबर रोजी बायडेन यांनी ट्रम्प समर्थकांना 'कचरा' म्हटले होते. बायडेन यांनी ट्रम्प यांना पाठिंबा देणाऱ्या कॉमेडियनच्या टीकेला हे उत्तर दिले.




## आंध्र प्रदेशमध्ये फटाक्याच्या पिशवीत स्फोट, एकाचा मृत्यू

**विजयवाडा :** ऐन दिवाळीत आंध्र प्रदेशात भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. आंध्र प्रदेशातील एलुरु येथे फटाक्यांच्या स्फोटात एकाचा मृत्यू झाला आहे, तर सहा जण जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका भीषण होता यामध्ये एका स्कूटीचे तुकडे झाले आहेत. त्यामुळे या स्फोटात मृत्यू झालेल्या आणि जखमींची अवस्था फारच वाईट आहे. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओही सोशल मीडियावर समोर आला आहे. फटाक्यांच्या स्फोटाच्या तडाख्यात रस्त्यावर उभे असलेले काही लोकही आले आहेत. एलुरु शहरात स्कूटरवरून जाणाऱ्या फटाक्यांच्या पिशवीचा अचानक स्फोट झाला, ज्यामुळे चालकाचा मृत्यू झाला.

# मोदींनी अकराव्यांदा सैनिकांसह साजरी केली दिवाळी

वृत्तसंस्था
भुज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील भारत-पाकिस्तान सीमेजवळ सीमा सुरक्षा दल (BSF), लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली.

एकता नगरहून कच्छमधील कोटेश्वर येथे उतरल्यानंतर मोदी सर क्रीक भागातील लक्की नाल्याजवळ पोहोचले, असं बीएसएफच्या अधिकाऱ्याने सांगितलं. "त्यांनी जवानांना स्वतः हातानं मिठाई भरवून दिवाळी साजरी केली," असं अधिकारी पुढे म्हणाले.

अधिकाऱ्यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये, बीएसएफचा गणवेश परिधान केलेले मोदी,



गस्ती जहाजावरील जवानांना मिठाई देताना दिसत आहेत. सैनिकांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, जेव्हा देश सशस्त्र दलातील जवानांना पाहतो तेव्हा सुरक्षेची हमी मिळते. "मला अभिमान आहे की आमच्या जवानांनी प्रत्येक कठीण काळात स्वतःला सिद्ध केलं आहे. मी कच्छमध्ये उभा आहे, त्यामुळे मला भारतीय नौदलाचा उल्लेख करायला हवा," असंही ते म्हणाले. "आज भारत स्वतःची पाणबुडी तयार करत आहे. आज आपलं तेजस लढाऊ विमान हवाई दलाचं बलस्थान बनत आहे. पूर्वी भारत हा शस्त्र आयात करणारा देश म्हणून ओळखला जायचा. आज भारत जगातील अनेक देशांना संरक्षण उपकरणे निर्यात करत आहे," असं पंतप्रधान मोदी यांनी संरक्षण क्षेत्राच्या वाढीबद्दल बोलताना सांगितलं.

"एकविसाव्या शतकातील गरजा लक्षात घेऊन, आज आम्ही आमच्या सैन्याला, आमच्या सुरक्षा दलांना आधुनिक साधनांनी सुसज्ज करत आहोत. आम्ही आमच्या लष्कराला जगातील सर्वात आधुनिक लष्करी दलांच्या गटात समाविष्ट करत आहोत. संरक्षण क्षेत्रात आमची आत्मनिर्भरता आहे," असं पंतप्रधान पुढे म्हणाले.

आदल्या दिवशी, पंतप्रधानांनी एकता नगर येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे सरदार वल्लभभाई पटेल यांना राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जाणारा भारताचा पहिला गृहमंत्री यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण केला.

पंतप्रधान मोदींनी सशस्त्र दलाच्या जवानांसोबत दिव्यांचा सण-दिवाळी साजरी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी त्यांनी लेह आणि लडाखमध्ये लष्कराच्या जवानांसोबत दीपावली उत्सव साजरा केला होता आणि सैनिकांना संबोधित केलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीनं अतिशय संवेदनशील असं व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी नेहमीच जवानांचं मनोबल उंचावण्यासाठी अनेकदा सैनिकांच्या सोबत त्यांच्या बिकट परिस्थितीतील ठाण्यावर जाऊन त्यांच्याशी बातचित केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान दिवाळीसारख्या सणाला जवानांच्यासोबत साजरा करण्याची मनोकामना पूर्ण करतात.

# रशियाचा 'गुगल'ला जागतिक जीडीपीच्या 620 पट दंड




## यूट्यूब चॅनल बंद केल्याबद्दल कोर्टाने ठोठावला दंड

## गुगल रशियात दिवाळखोर घोषित

वृत्तसंस्था
मॉस्को

रशिया आणि गुगल यांच्यात सुरू असलेला वाद आता संपूर्ण जगासाठी चर्चेचा विषय बनला आहे. क्रेमिकल समर्थक आणि सरकारी मीडिया आउटलेट्सची खाती पुनर्संचयित न केल्याने रशियानेगुगलविरोधात अशी कारवाई केली आहे की, जी संपूर्ण जगात चर्चेचा विषय बनली आहे. या प्रकरणी रशियन न्यायालयाने गुगलला एवढा दंड ठोठावला आहे की, आपणही थक्क व्हाल. खरे तर, एवढा पैसा या संपूर्ण पृथ्वीवरही उपलब्ध नाही.

खरे तर, गूगलला 2 अनडेसिलियन रूबल अथवा 2.5 डेसिलियन अमेरिकन डॉलर एवढा दंड ठोठावण्यात आला आहे. आता, ही रक्कम नेमकी किती? असा प्रश्न आपल्याला पडला असेल. तर, एक डेसिलियन ही एक कार्डिनल संख्या आहे. अमेरिकेमध्ये 1 नंतर 33 शून्य देऊन ही संख्या दर्शवली जाते. तर ग्रेट ब्रिटनमध्ये 1 नंतर 60 शून्य देऊन ही संख्या दर्शवली जाते. वर्ल्ड बँकेच्या आकडेवारीनुसार, जगाचा एकूण जीडीपी 100 ट्रिलियन डॉलर एवढा आहे. यावरून ही रक्कम किती मोठी आहे, याचा अंदाज येऊ शकतो. यामुळे एवढी मोठी रक्कम चुकवणे अथवा एवढ्या दंडाची भरपाई करणे गूगलच्या आवाक्या बाहेर आहे. रशियन मीडिया आउटलेटविरोधात ऑगस्ट महिन्यात तीन प्रतिवादी खटले दाखल केल्यानंतर गुगलला दंड ठोठावण्यात आला आहे. तीन्ही खटल्यांत रशियन न्यायालयाचा निर्णय "अयोग्य" असल्याचे म्हणण्यात आले आहे. ज्यांत गूगल आणि गुगलशी संलग्न कंपन्यांना नियमांचे पालन न केल्याने आर्थिक दंड करण्यासंदर्भात भाष्य करण्यात आले आहे.महत्वाचे म्हणजे, रशियाने फेब्रुवारी 2020 मध्ये युक्रेनवर हल्ला केला. यानंतर गुगलने, आपण रशियन राज्य-अनुदानीत मीडियासाठी कमाईचा कार्यक्रम थांबवत आहोत, अशी घोषणा केली होती. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, गुगलने युद्धसंदर्भातील आपल्या कंटेंट विषयक नियमांच्या पालनासंदर्भात 1000 हून अधिक YouTube चॅनल्स ब्लॉक केले आहेत.

पान ९ वरुन

### जगभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी

आनंद आणि आशीर्वाद घेऊन येणारे हे दिवे वाटून घेत आहेत. संगीत, नृत्य, उत्सवाचा आनंद आणि कृतज्ञतेने भरलेल्या अंतःकरणाने प्रकाशांचा सण साजरा करण्यासाठी उत्सवात आमच्यासोबत सामील व्हा. भारतातील यूएस मिशनच्या वतीने मी सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा देतो.रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनीही हिंदीतून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर, मी आमच्या भारतीय मित्रांना मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांना आनंद आणि समृद्धीची शुभेच्छा देतो.

### आम्ही राहुल गांधी यांना भेटण्यासाठी उत्सुक!

होसबळे म्हणाले की, जिथे शाखा नसते तिथे हिंदू समाजाचे लोक एकत्र येतात. आपसांत बंधुभाव आणि हिंदू संस्कृती शिकवण्याचे काम करतात. राहुल गांधींबद्दल बोलताना होसबळे म्हणाले की, समाजात कुठलाच द्वेष नकोय. तुम्ही द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान चालवू पाहता, पण तुम्हाला आम्हाला भेटण्याची इच्छा नाही. आम्हाला तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे. संघाचे लोक सगळ्यांना भेटतात असेही होसबळे म्हणाले. भाजप नेते वरुण गांधी लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये सामील होतील अशी चर्चा होती. राहुल गांधी तेव्हा म्हणाले होते की त्यांनी संघाची विचारसरणी मान्य केली आहे. पण माझा गळा कापला तरी चालेल पण मी संघाच्या कार्यालयात जाणार नाही, असे राहुल गांधी म्हणाले होते.

### मनसेला महायुतीत सध्यातरी 'स्कोप' नाही

त्यांनी महायुतीच्याविरोधात देखील उमेदवार उभे केले आहेत. महायुतीत भाजप शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांसोबत रिपाईचा प्रामुख्याने समावेश आहे. मनसे सध्या महायुतीत नाही. एखाद दोन जागांवर मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने मदत अलायन्स करू शकतो. शिवडीच्या जागेबाबत मुख्यमंत्र्यांनी भूमिका घेतली होती, याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधले. मनोज जरांगे दिवसातून तीन वेळा माझे नाव घेतात. मात्र ज्यांनी 1982 पासून मराठा आरक्षण अडवून ठेवले त्यांच्याबद्दल ते काही बोलत नाही. त्यामुळे मला त्यांच्याबद्दल काही बोलायचे नाही, असे फडणवीस म्हणाले.

### एक देश एक कायदा...

आपण हा उत्सव पुढची 2 वर्ष साजरा करणार आहोत. त्यांत्या असामान्य कारकीर्दीला वाहिलेली ही श्रद्धांजली असेल. ज्या वेळेस भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा काही जणांना वाटत होते की देशाचे तुकडे पडतील परंतु सरदार पटेल यांनी मात्र तसे होऊ दिले नाही, असं मोदी म्हणाले.

# बदायूमध्ये 4 कुटुंबियांसह 6 जणांचा मृत्यू

## दिवाळी साजरी करण्यासाठी नोएडाहून बरेलीला जात होते

वृत्तसंस्था
बदायू

बदायू येथे भरधाव वेगात असलेल्या मॅक्सने (पिकअप) ऑटोला धडक दिली. या अपघातात ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या सहा जणांचा मृत्यू झाला. यामध्ये पती-पत्नी आणि मुलगा-मुलगी म्हणजेच एका कुटुंबातील 4 लोकांचा समावेश आहे. सर्वजण दिवाळी साजरी करण्यासाठी नोएडाहून बरेली येथील त्यांच्या घरी जात होते.

ही धडक इतकी भीषण होती की, मृतदेह रस्त्यावर अनेक फूट दूर पसरले. पोलिसांनी मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. गुरुवारी सकाळी 7 वाजण्याच्या सुमारास दिल्ली महामार्गावरील मुझरिया



गावाजवळ हा अपघात झाला. डीएम निधी श्रीवास्तव यांनी सांगितले - अपघातात 6 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 5 जण जखमी आहेत. अपघातानंतर एकच जल्लोष झाला. ऑटोतील लोक उडी मारून रस्त्यावर पडले. कुणाचे डोके फुटले तर कुणाचा हात कापला गेला. काही वेळाने पोलिस रुग्णवाहिका घेऊन आले. जखमींना जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले.

यात 6 जणांचा जागीच मृत्यू झाला. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये 4 जण बरेलीतील एकाच कुटुंबातील आहेत. कन्हाई, पत्नी कुसुम, मुलगा कार्तिक आणि मुलगी शीनू अशी त्यांची नावे आहेत. तर एक मृत मिर्झापूर येथील रहिवासी आहे. अतुल असे त्याचे नाव आहे. एका मृताची ओळख अद्याप पटलेली नाही.

ऑटो बुक करून घरी येत होते, मॅक्स चुकीच्या बाजूने येत होता. जखमींपैकी एक म्हणाला- आम्ही नोएडामध्ये काम करायचो. दिवाळी साजरी करण्यासाठी सर्वजण ऑटो बुक करून घरी परतत होते. सकाळी सातच्या सुमारास ऑटो मुझरिया गावाजवळ पोहोचला. हायवेच्या चुकीच्या बाजूने मॅक्स येत असल्याने ही धडक झाली. दरम्यान, मागून येणारी कारही दुभाजकाला धडकली. यात टेम्पो चक्काचूर झाला.

## हेडफोन कानात घालून रेल्वे ट्रॅकवर बसलेला विद्यार्थी चिरडला ट्रेनखाली

भोपाळ

हेडफोन आणि मोबाइल याचा गरजेपेक्षा अधिक वापर विद्यार्थी आणि तरुणांसाठी घातक ठरत आहे. अनेक उदाहरणांमधून हे समोर आलेलं आहे. भोपाळमध्ये हेडफोन आणि मोबाइलमुळे एका २० वर्षीय विद्यार्थ्याला आपले प्राण गमवावे लागले आहेत. रेल्वे रुळावर मोबाइलवर व्हिडीओ पाहण्यात तल्लीन झालेल्या मनराज तोमर या विद्यार्थ्याला ट्रेनने चिरडले, ज्यात त्याचा मृत्यू झाला. मनराज कानात हेडफोन घालून बसल्यामुळे त्याला ट्रेनचा आवाजही कळला नाही आणि तो रुळावरच बसून राहिल्यामुळे सदर दुर्दैवी घटना घडली.

## नेपाळने चिनी कंपनीला दिले नोटा छापण्याचे कंत्राट

### 100 रुपयांच्या 30 कोटी प्रती छापल्या जातील

वृत्तसंस्था
काठमांडू

नेपाळची मध्यवर्ती बँक 'नेपाळ राष्ट्र बँक' ने 100 रुपयांच्या नव्या नेपाळी नोटा छापण्यासाठी एका चिनी कंपनीला कंत्राट दिले आहे. वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, या नोटांवरील नकाशात भारतातील लिपुलेख, लिंपियाधुरा आणि कालापानी भाग नेपाळचा भाग म्हणून दाखवण्यात आले आहेत. या क्षेत्राबाबत भारत आणि नेपाळमध्ये सुमारे 35 वर्षांपासून वाद आहे.

रिपोर्टनुसार, चीनच्या 'बँक नोट प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन' या कंपनीला नोटा छापण्याचे कंत्राट मिळाले आहे. चिनी कंपनी नेपाळी चलनी नोटांच्या 30 कोटी प्रती छापणार आहे. यासाठी सुमारे 75 कोटी भारतीय रुपये लागणार आहेत. म्हणजेच 100 रुपयांची 1 नेपाळी नोट छापण्यासाठी सुमारे 2.50 भारतीय रुपये मोजावे लागतील. नेपाळमध्ये नेपाळ राष्ट्र बँकेला नोटांचे डिझाइन बदलण्याचा अधिकार आहे. मात्र, त्यासाठी त्यांना शासनाची मंजुरी घ्यावी लागणार आहे. नेपाळच्या मंत्रिमंडळाने यावर्षी मे महिन्यात या नोटेच्या डिझाइनमध्ये बदल करण्यास मंजुरी दिली होती.

त्यावेळी पुष्प कमल दहल प्रचंड नेपाळचे पंतप्रधान होते. केपी शर्मा ओली या सरकारला पाठिंबा देत होते. 12 जुलै रोजी ओली यांनी प्रचंड सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. आता ते नेपाळचे पंतप्रधान आहेत.

# अमेरिकन राजदूत एरिक गार्सेटींचे तौबा-तौबा वर नृत्य

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

देशभरात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. दरम्यान, अमेरिकेचे राजदूत एरिक गार्सेट्टी यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ते तौबा तौबा गाण्यावर जबरदस्त डान्स करताना दिसत आहेत. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लोक त्यांच्या भारतीय संस्कृतीशी असलेल्या संबंधाची प्रशंसा करत आहेत.

**अमेरिकन दूतावासात दिवाळी साजरी**



वास्तविक, दिल्लीतील अमेरिकन दूतावासात दरवर्षी दिवाळी साजरी केली जाते. यावेळीही दिवाळी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये अमेरिकन राजदूत एरिक गार्सेटी कुर्ता पायजमामध्ये देसी स्टाईलमध्ये दिसले होते. पण विकी कौशलचे तौबा-तौबा गाणे वाजताच एरिक यांनी स्टेजवर पोहोचून नाचायला सुरुवात केली, ज्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. त्याचवेळी अमेरिकेचे राजदूत एरिक गार्सेट्टी यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. प्रत्येकजण त्यांच्या नृत्याचे कौतुक करत आहे.

## दिवाळीत घरात सिलेंडरचा स्फोट, पतीचा मृत्यू


वृत्तसंस्था
कानपूर

कानपूरमध्ये ऐन दिवाळीत सिलेंडरचा स्फोट झाला. अपघातात पतीचा मृत्यू झाला असून पत्नी गंभीर जखमी आहे. हा स्फोट इतका जोरदार होता की शरीराचे चिथडे चिथडे उडून भिंतीला चिकटले. घराच्या काही भागाचे नुकसानही झाले आहे. सिलेंडरचा स्फोट इतका भीषण होता की, शेजारच्या सहा घरांना भेगा पडल्या आहेत. कार आणि दुचाकींचे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर पती-पत्नीला रुग्णालयात नेण्यात आले. जिथे डॉक्टरांनी पतीला मृत घोषित केले. तर पत्नीची प्रकृती चिंताजनक आहे.




# स्पेनमध्ये 50 वर्षांतील सर्वात भीषण पूर, 95 लोकांचा मृत्यू

**देशात 3 दिवसांचा राष्ट्रीय शोक**



वृत्तसंस्था
माद्रिद

स्पेनमध्ये अतिवृष्टी आणि अचानक आलेल्या पुरामुळे आतापर्यंत 95 जणांचा मृत्यू झाला आहे. सीएनएननुसार, व्हॅलेन्सिया शहराला सर्वाधिक फटका बसला आहे. आतापर्यंत येथे 92 लोकांचा मृत्यू झाला आहे. अजूनही अनेक लोक बेपत्ता असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, स्पेनमध्ये गेल्या 50 वर्षांतील पुरामुळे मृत्यू झालेल्यांची ही सर्वाधिक संख्या आहे. यापूर्वी 1973 मध्ये पुरामुळे 150 लोकांचा मृत्यू झाला होता.

राज्य हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार, बुधवारी पूर्व स्पेनमध्ये अनेक ठिकाणी काही तासांत 12 इंचांपेक्षा जास्त पाऊस पडला. व्हॅलेन्सियाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, अवघ्या अर्ध्या तासात शहरात विध्वंस झाला.परिस्थिती इतकी बिकट आहे की न्यायालयाचे रूपांतर तात्पुरत्या शवागारात करण्यात आले आहे. या दुर्घटनेनंतर स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी 3 दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

